म. ग्र. स. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८०६

# गोतावळा
## एक अभ्यास



लेखक :
प्रा. अजय एम्. ए. (कोल्हापूर)
प्रा. संजय एम्. ए. (सोलापूर)
प्रा. अविनाश एम्. ए. (सांगली)

REFBK-0022911

साहित्य सेवा प्रकाशन, सातारा

निबंध [आदिस अमिक्षा]

टीकात्मक, विस्तृत, मुद्देसूद विवेचन असलेले


**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्र. मा. प. )
५०००-४-८०


३-५०


...सेवा प्रकाशन -...

प्रकाशक :

शां. ने. लुणावत
साहित्य सेवा प्रकाशन
११७ भवानी पेठ,
सातारा.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

मुद्रक :

रा. शं. जोरी
इंदिरा प्रिंटिंग प्रेस.
१००५ सदाशिव पेठ
पुणे ३०.

निषिद्ध साहित्य समि
२००४
४।७।८०
२२०७७ संदर्भशाख

# गोतावळा—एक अभ्यास

**मराठीतील प्रादेशिक कादंबरी :**

मराठीतील कादंबरीला सुमारे सव्वाशे वर्षांचा वैभवशाली इतिहास आहे. हरिभाऊ आपटे, ना. ह. आपटे, वामनराव जोशी, केतकर, फडके, खांडेकर, माडखोलकर, शिरूरकर इ. छोटचा-मोठया लेखकांनी मराठीतील कादंबरी क्षेत्रात फार मोठी मोलाची भर घातली. सामाजिक आणि ऐतिहासिक अशा कादंबऱ्यांनी मराठी कादंबरी समृद्ध झाली. नवे नवे प्रकार थोडयाफार कमी प्रमाणात आविष्कृत झालेले असले तरी जातिवंत व अस्सल सामाजिक जाणिवा, तशीच अनुभूती, अभिव्यक्तीची पोटतिडीक, सामाजिक समस्यां-विषयी अतीव जिव्हाळा आणि स्त्रीसुधारणेविषयी पुरोगामी ठाम मते यामुळे अंतरंगाने मराठी कादंबरी कमालीची लोकप्रिय ठरली. हरिभाऊंनी जी एक आशयाचा संदर्भात दिशा दाखवून दिली; त्याच दिशेने आणि त्याच वाटेने बहुतांशी कादंबरीकारांनी आपल्या जीवन-चिंतनाचा कादंबरीद्वारा आविष्कार केला. फडक्यांनी स्वप्नरंजनात्मक, वामनराव जोशी तत्त्वचिंतनात्मक आणि केतकरांनी समाजशास्त्रीय सूत्र आपापल्या कादंबरीत प्रामुख्याने गुंफलेले असले तरी हरिभाऊंच्या कादंबऱ्यांची पुसटशी छाया त्यांच्यावर पडलेली दिसते असे म्हटले तर वावगे होणार नाही. पु. य. देशपांडे, खांडेकर, शिरुरकर यांनी सामाजा-तील विषमता आणि स्त्रीदास्यावर भर दिला; तर माडखोलकरांनी काही अतिरंजित शृंगाराच्या कादंबऱ्याबरोबरच ज्याला स्थूळ अर्थाने राजकीय म्हणता येईल अशा कादंबऱ्या लिहिल्या. ना. ह. आपटयाने प्रामुख्याने कौटुंबिक कादंबऱ्यावर भर दिला. आणि एकेक भारतीय मूल्य घेऊन त्याचा आविष्कार केला.

ऐतिहासिक कादंबरीची सुरुवात हरिभाऊ आपटयांनी केल्यावर त्या क्षेत्रातही काहींनी भर घातली. नाथमाधव व हडप यांची नावे प्रामुख्याने ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून घेता येतील. नाथमाधवांनी आपल्या कादंबऱ्यांतून शिवकाल कल्पित प्रसंग पात्रांच्या साह्याने कल्पनारंजनाच्या स्वरूपात व अद्‌भुताची जोड देऊन साकार केला. तर हडपांनी पेशवाईचा ऐतिहासिक काळ त्याच प्रकारे ऐतिहासिक कादंबऱ्यातून साकार केला. अशा प्रकारे मराठीतील सामाजिक व ऐतिहासिक कादंबरी विकसित होत आली. स्त्रीजीवनाला त्यातही मध्यमवर्गीय स्त्रीजीवनाला—कादंबऱ्यात प्राधान्य मिळत गेल्याने प्रादेशिक अथवा ग्रामीण जीवनाकडे लेखकांचे जावे तेवढे लक्ष गेलेले दिसत नाही. सरदेसाई, सुखटणकर यांनी गोव्याच्या नि सह्याद्रीच्या परिसरातील समाजाचे आपल्या कथांतून चित्रण केलेले असले तरी त्या साहित्याला एक स्वतंत्र शाखा म्हणून महत्त्व प्राप्त झालेले नव्हते. त्याच

सुमारास मराठी कादंबरीक्षेत्रात र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, विचूरकर, म. भा. भोसले श. रा. भिसे, वा. ब. कार्णिक, प. चि. सहस्रबुद्धे इ. लेखकांनी प्रादेशिक कादंबऱ्या लिहायला प्रारंभ केला. या सर्व लेखकांनी खेडेगावातील वस्तुस्थितीचे चित्रण केलेले असले तरी काहींनी भडक नाटयाचा अवलंब केला; काहींनी रोमँटिक स्वरूपात ग्राम जीवन न्याहाळले, काहीनी सामाजिक विषमता चित्रित केली. काहींनी सावकार आणि शेतकरी यांचे झगडे चित्रित केले. काहींनी चावून चोथा झालेली प्रेमकथाच परंतु ग्रामीण परिसराची पार्श्वभूमी घेऊन साकार केली. स्थूलमानाने असे म्हणता येईल की ग्रामीण जीवनाचे कादंबरीतून कलात्मक अपेक्षा पूर्ण करण्याचे सामर्थ्य फार कमी आहे–कमी होते. काहींनी जवळून पाहिलेले वास्तववादी आणि सहानुभूतीने ओथंबलेले असे लेखन केलेले असले तरी श्रेष्ठ स्वरूपाचा कलात्मक आनंद आणि वास्तवाचे सर्वांगीण प्रत्ययकारी अन् विस्मित करणारे ग्राम जीवन या कालखंडातील लेखकांनी संपूर्णपणे व्यक्त केलेले नाही. काही लेखकांनी तर विशिष्ट अशी 'पोज' घेऊनच लेखन केलेले असल्याने ते ते ग्रामजीवन 'साक्षात' करण्यात म्हणावे तितके यशस्वी झालेले नाहीत

मात्र एका विशिष्ट वर्तुळात फिरणाऱ्या प्रादेशिक कादंबरीला, माडगूळकर, पेंडसे, दांडेकर, रणजित देसाई, मधु मंगेश कर्णिक इ. लेखकांनी विकासाच्या नव्या वाटा दाखविल्या. दांडेकरांनी शितू, पडघवली, पवनाकाठचा धोंडी इ. कादंबऱ्यातून रसरशीत प्रादेशिकतेचे जिवंत जीवन दर्शविले आहे. त्यांच्या पडघवलीने तर एक नवेच दालन आविष्कृत केलेले आहे. ही कादंबरी म्हणजे मराठीतील एक चांगला आणि यशस्वी प्रयोग आहे असे म्हटले पाहिजे. श्री. ना. पेंडशांनी देखील एल्गार, हद्दपार, गारंबीचा बापू, यशोदा इ. कादंबऱ्या लिहून ग्रामीण कादंबरी किंवा प्रादेशिक कादंबरी चांगलीच लोकप्रिय केली. तिची पाऊलवाट रुंदावली. तिला कलात्मक मूल्य प्राप्त करून दिले. तिच्या माध्यमातून जीवनाच्या गतागंतीच्या भावभावनावर प्रकाश टाकला. एखादी लोकप्रिय 'पोज' न घेता जे जे भावले, झोंबले, अंःकरणातून सहजपणे उचंबळून वर आले ते ते त्यांनी कलात्मक सचोटी आणि आविष्काराचा प्रामाणिकपणा सांभाळून अत्यंत प्रभावी रीतीने व्यक्त केलेला आहे. शिवाय प्रादेशिक कादंबऱ्यातही त्या प्रदेशाचे लोभसवाणे प्रत्यकारी चित्रण व व्यक्तीप्रधान कथानक इ. गोष्टी त्यांच्या लेखणीत सहजपणे चित्रित करता येतात, मधु मंगेश कर्णिकांची 'देवकी' एका निष्पाप स्त्रीवर झालेल्या अन्यायामुळे तिच्या जीवनाची व मनाची झालेली ससेहोलपट प्रभावीपणे चित्रित करणारी आहे. कोकणातील रीतीरिवाजामुळे व वातावरणामुळे तिचे दुःख अधिक गहिरे झालेले आहे. रणजित देसाईनी देखील 'स्वामी' कादंबरीच्या अगोदर दोन प्रादेशिक कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. त्यातील एक बेळगावच्या परिसरात असलेल्या जंगलातील लोकांची जीवनकथा अतिशय कलात्मकतेने साकार केलेली आहे, 'माझा गाव' कादंबरीचे प्रातिनिधिक असे चित्रण आलेले आहे. मात्र माडगूळकरांच्या बनगरवाडीने जी एक कलात्मक उंची, अभिव्यक्तीची तरलता, ग्रामीण

संग्रहालय ठाणे
२००८
निबंध

जीवनाचा सूक्ष्म व संवेदनाशील आविष्कार केला; तो करीत असताना जे ग्राम जीवन कोणताही विशिष्ट दृष्टीकोन न स्वीकारता माणदेशातील गरीब [illegible], [illegible] कष्टाळू, अज्ञानी, माणुसकीने ओथंबलेली माणसे अतिशय सहानुभूतीने [illegible] कलंक न लावता आविष्कृत केलेले आहे त्याला जोड नाही. बनगरवाडी हा एक प्रादेशिक कादंबरीतील कलात्मक उंची मोजण्याचा मानदंड मानला पाहिजे. अस्सल व अव्वल असे ग्रामीण जीवन चित्रित करण्यात ते कमालीचे यशस्वी झालेले आहेत.

त्याचबरोबर अण्णाभाऊ साठे व शंकरराव खरात, रा. रं. बोराडे यांचाही ओझरता विचार केला पाहिजे. अण्णाभाऊंचे व खरातांचे कादंबरीलेखन दलितांच्या व्यथा–वेदनाचा शब्दलेख कमालीच्या पोटतिडकीने व्यक्त होत आलेला आहे. फकिरासारख्या कादंबरीतून अण्णाभाऊ साठे यांनी एका हाती तलवार आणि दुसऱ्या हाती मानवतेचा दीप घेऊन सरकारी अन्यायी राजवटीविरुद्ध आणि त्यांच्या भारतीय अधिकाऱ्याविरुद्ध उभा राहून स्वेच्छेने मृत्यूला मिठी घालणाऱ्या पददलित फकिराचे मोठे तेजःपुंज आणि चित्तथरारक चित्र उभे केलेले आहे. बाकीच्या कादंबऱ्या मात्र मनोरंजनाचा हेतु समोर ठेवून ग्राम जीवनातील नाट्य साकार करणाऱ्या अशा आहेत. खरातांच्या कथा–कादंबऱ्या या देखील पददलिताचा आवंढा शब्दबद्ध करणाऱ्या अशाच आहेत. रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' देखील ग्रामीण जीवनातील ताण आणि तणाव कलात्मक रीतीने साकार करण्यात समर्थ आणि यशस्वी ठरलेली आहे.

– अशा या प्रादेशिक कादंबरीला उधान आलेल्या काळात –

– अशा सर्वांगाने भावफुलांनी मोहोरलेल्या कादंबरीक्षेत्रात –

– अशा या नाट्य, कारुण्य आणि दारिद्र्य साकार करणाऱ्या जमान्यात –

– अशा या व्यक्तीप्रधान प्रादेशिक कादंबरीक्षेत्रात –

– अशा या कलात्मकतेच्या साह्याने निकोप रूप धारण करण्याच्या काळात –

– अशा या दुथडी भरुन वाहणाऱ्या कादंबरीच्या महापुरात –

आनंद यादवाच्या 'गोतावळा' कादंबरीचे स्थान कोणते, स्वरूप कोणते नि वेगळेपण कोणते याचाच आपणास थोडक्यात परिचय करून घ्यायचा आहे.

आनंद यादवांची ही पहिली – वहिली कादंबरी असून देखील प्रादेशिक कादंबरीत – ग्रामीण भावजीवन चित्रित करणाऱ्या कादंबरीत तिने फार मोठे मानाचे स्थान पटकावले आहे. प्रादेशिक कादंबरीची जी एक साचेबंद अवस्था निर्माण झालेली होती ; तिला जे एक स्थितीशील, साचलेले रुप आलेले होते; त्याला गतीशील करण्याचे, वाहते करण्याचे काम 'गोतावळा' कादंबरीने केलेले आहे. वाचकांच्या, समीक्षकांच्या अपेक्षा उंचावलेल्या आहेत. प्रादेशिक कादंबरी लिहिणाऱ्या लेखकांना जीवनानुभूतीच्या आविष्कार

करण्याचे एक नवे आव्हान या कादंबरीने दिलेले आहे. किंबहुना एका अलक्षित अशा ग्रामजीवनाशी निगडीत असलेल्या मुक्या प्राण्यांच्या भाव – भावना प्रथमच मराठीत शब्दबद्ध केलेल्या आहेत.

**' गोतावळा 'चे कथानक :**

रुढार्थाने गोतावळा कादंबरीत कथानक नाही. कादंबरी म्हटल्यावर घटनांची जी एक शृंखला असते; उपकथाची जी एक जोड असते ती या कादंबरीत नाही. लाटामागून लाटा याव्यात नि किनाऱ्यावर आपली मुद्रा उमटवून लोप पावाव्यात; तशा घटना–मागून घटना येऊन भावनामय स्वरूपाच्या मध्यवर्ती केंद्रात एकरूप होतात. तसे म्हटले तर या कादंबरीत भरपूर घटना व प्रसंग आहेत; आणि म्हटले तर नाहीत. गुलाबाचे फूल जसे लांबून पाहिले तर एक दिसते पण ते त्याच्या अविभाज्य पाकळ्यांनी बनलेला असते अशी या कादंबरीतील कथानकाची जडण घडण आहे. सांगायचेच झाले तर थोडक्यात असे कथानक सांगता येईल.

रामु सोनवडा हा एक सधन बागाईतदार शेतकरी कोल्हापूरपासून १५ मैल दूर असलेल्या खेड्यात राहतो. त्याची जमीन भरपूर, मळा मोठा आणि गुरेढोरेही तितकीच. त्यांची वास्तपुस्त करण्यासाठी त्याने मळ्यातच झोपडी बांधलेली असते. गुरेढोरे व बार-दाना मोठा असल्याने त्याची व्यवस्था पहाण्यासाठी मालकाने नारबा नावाचा एक गरीब अनाथ सालगडी म्हणजे सालावर काही रक्कम ठरवून ठेवलेला गडी असतो. हा नारबा पोरका आहे. बाप वयाच्या किशोरावस्थेतच गेलेला असतो आणि आई नारबाच्या पंध-राव्या वर्षी वारलेली असते. त्याला ना कोणी नात्याचे; गोत्याचे. लांबचे जवळचे असे कोणीच नसल्याने अगदी बालपणापासून तो वीस वर्षं मालकाच्या मळ्यावर प्रामा-णिकपणे, विश्वासूपणाने, आत्मीयतेने कामे करीत असतो. दर वर्षी मालक त्याला ' लग्न करून देतो ' म्हणून आश्वासन देतो. पण करीत मात्र नाही. त्यामुळे तो तसा उपाशी आहे, कोरडा आहे. अंगात 'ढोरागत' रग असून मालकाने त्याला 'बिनबायकूचा' ठेवलेला असतो. मालक पोटाला काही कमी करीत नव्हता, पण नारबाचे दोनाचे चार हात काही तो करून देत नव्हता. दर वर्षी तो फक्त आश्वासन देई. " तुला पोरगी फैना बघून आणतो. " पण आणत मात्र नसे. त्यामुळे एकलेपणाचे त्याला भारी दुःख होई. ज्या नारबाच्या कष्टा-वर अन् रक्तावर रामू सोनवड्याचा सारा खटला व घरदार पोसले जाते तो सोनवड्या नारबाच्या सुखदुःखाशी कधी एकरूप होत नाही. झीज खात नाही. हात सैल करीत नाही. त्याला साधी एक दिवसाची देखील सुट्टी मिळत नाही. मळ्यातून दूध घेऊन घरी आलेल्या नारबाला चार घटका निवांतपणे गावात–घरात बसावं म्हटलं तरी बसता येत नाही. हा नारबा शेतातली सारी कामे मात्र प्रामाणिकपणे व वक्तशीर करीत असतो. गुरा–ढोरांची शेण–घाण तोच काढतो. धारा तोच काढतो. कोंबड्या व पिले सोडणे व डालणे तोच

करतो. वैरण तोच काढतो. गुरांना घालतो. जनावरे चरावयास तोच नेतो. बांधतो. आंधळ्या घोड्याची देखभाल तोच करतो. बैलांची उस्तवारी तोच करतो. नांगरट, कुळवण, खत घालण, मोट मारणे, पाणी पाजणे, मळ्याची राखण करणे, कडबा कापणे सारी सारी कामे तोच आणि तोच करतो. जोडीला सित्या नावाचा गडी असतो. पण जेवढ्यास तेवढाच राबणारा. दिवस बुडायच्या आत तो घरी पळतो. आपल्या बायका-मुलांत रमतो. नारबा मात्र रात्री बैलांची वैरण पाहण्यापासून तो कुत्री–कोंबड्यांची देख-भाल करण्यापर्यंतची सारी कामे मन लावून करायचा. मालकाच्या हिशेबी नारबा म्हणजे एक ढोरच होता. ढोरांत उठणे बसणे. ढोरात वागणे. त्यामुळे त्यालाही ढोरे माणसा-सारखीच वाटायची. त्याला त्यांचे मत कळे. त्याला त्यांचा अतीव लळा लागलेला. आपल्या मनातले एकलेपणाचे दुःख, प्रेमविहीन जीवन या ढोरांवर प्रेम करून तो भरून काढी. त्याच्या सुखदुःखाचे साक्षीदार तेच होते. त्याचा विसावा तेच होते. त्यामुळे तो गुरा–ढोरां-कडे व्यवहारिक दृष्टीने कधीच पाहू शकत नसे. त्याला आपल्या जगण्याचा एकमेव आधार ही ढोरे वाटत असल्याने मळ्यावर असलेल्या साऱ्या ढोरांची तो मनाने 'आई' बनलेला असतो. आणि उलट पक्षी जे क्षेत्र त्याला माणसांकडून मिळत नाही. ते त्याला गुरा–ढोरांपासून मिळते. तोच त्याचा गोतावळा आहे. या साऱ्यांशीच त्याचे भावजीवन गुंतलेले असते. आणि त्याच भावजीवनावर तो मालकाची कोरडी भाकरी स्नेहाच्या पाण्यात भिजवून जिभेआड करीत असतो. आला दिवस पाठीमागं ढकलंत असतो. खरं म्हणजे तो जगतो प्राण्यामुळं. प्राण्यांसाठीः प्राण्यांच्या प्रेमावर. आणि शेती–मळा व हिरवा गच्च असलेल्या माळाला डोळ्यात साठवत. त्याचे सारे भावजीवन हे असे मातीशी, मातीतून वर येणाऱ्या अंकुरांशी आणि त्या अंकुरावर जगणाऱ्या निसर्गदत्त संपत्तीशी जखडलेले असते. म्हणूनच शेतीला तो आपली 'काळी आई' संबोधतो व जनावरांना सगेसोयरे.

पण त्याच्या या भावजीवनाला अचानक तडा जातो. मालक एका पांढऱ्याधोट कपडे केलेल्या माणसाला मळ्यावर एकदा घेऊन येतो. पांढऱ्या कागदावर काही काळेबेरे करतो. रेघाटचा ओढतो. आणि त्याला ट्रॅक्टर आणायला प्रवृत्त करतो. ट्रॅक्टरची भारी किंमत माल-काला झेपणारी नसते. म्हणून पाहुणा मालकाला सल्ला देतो की ही भाकड जनावरे, निरुपयोगी ढोरे, ही माळावरची झाडे, सारे सारे विकून टाक. त्याचा पैसा होईल. जनावरे विकल्याने वैरण वाचेल. त्याची रक्कम येईल. शेतीची सारी मशागत ट्रॅक्टर करणार अस-ल्याने बैलदेखील ठेवण्याची गरज नाही. त्याला एकेक जनावर कमी झालेले हवेच होते. एकेक जनावर कमी–कमी होत चाललेले पाहून मालकाला बरे वाटायचे. उलट एक एक खुंटा रिकामा पडत चालला म्हणजें नारबाला एक–एक दात पडल्यासारखे वाटायचे. पोकळी जाणवावयाची.

मालकाने म्हैस विकली. एक दिवस निकामी झालेले घोडे गेले. चंपी कुत्री गेली तिच्या दुःखाने नाम्या कुत्रा गेला. म्हातारा बैल मेल्यावर मांगांनाच मिळणार होता. पण

मेल्यावर त्याचे मांस खायला ते तयार नसल्याने मालकाने पन्नास रुपयाला तो बैल विकून टाकला. मांग त्यांना आता कापून खाणार होते. कोंबडा फार माजला होता. मालकाने चार लोकांना बोलावून त्याचे जेवण घातले. नारबानेही रस्सा खाल्ला. त्याला कसेसेच झाले. गाय, पारडी, म्हशी, रेडे, बैल, सगळे एकामागून एक गेले. नारबाच्या आतडचाला पीळ पडू लागला. त्याच्या भावबंदाच्या मुळचा तटातट तोडल्यासारखे झाले. कोंबडीचे एकेक पिल्लू मुंगूस पळवून नेत होते. नारबाला वाटे आपल्या काळजाचा एकेक लचका तुटत चाललेला आहे. त्याला आपले आयुष्य आणखीनच भकास वाटू लागले. गुरांपैकी दोन बैल–सोन्या–चाण्या–तेवढे राहिले होते.

उसाचा हंगाम संपला आणि अखेर एक दिवस ट्रॅक्टर आला. त्याच्याबरोबर त्याचा ड्रायव्हर आला. त्याने नारबाचीच भाकर खाल्ली. नारबा उपाशीच राहिला. एकदा चाण्याची लाथ लागली म्हणून ड्रायव्हरने त्याला काठीने खूप बडवले. ते नारबाला सहवले नाही. त्याने सारे बळ एकवटून ड्रायव्हरच्या हातातील काठी घेतली. आणि दरडावून तंबी दिली. ड्रायव्हरने मालकाकडे कागाळी केली. मालकाने नारबालाच डाफरले. नारबाला खूप दुःख झाले. त्याला कढ आवरता आला नाही. त्याचे डोळे डबडबले. ढोर बोलू शकत नव्हते. म्हणून तो ढोराचे व आपले दुःख अश्रूवाटे ओकत होता. पण मालकाला त्याचे काहीच वाटत नाही, तो म्हणाला, ' हे बघ, सोसवत नसेल तर तुझी तू वाट धर सूट असाच. ' मालकाने त्याच्या काळजावर असा खोलवर घाव घातला. त्याला भोवंडून आले. प्रकृती बिघडली. तो टमरेल घेऊन निघाला. माळावरून जाताना त्याला सारी झाडे तोडून टाकलेली दिसली, नखांनी फाडावा तसा सगळा माळ ट्रॅक्टरने फाडून काढला त्याला हात वर करायला झाड राहिले नव्हते. ससा–पिलांना बिळे राहिली नव्हती. पक्ष्यांना घरटी बांधता येणार नव्हती. मोरांना बसायला झाडोरा उरला नव्हता. नारबा उचमळत चालला होता. त्याच्या समोर मांजर व शेळी चाललेली होती. त्याला चालवत नव्हते. पायातले बळ तर निघून गेलेच होते. पण मनातले अधिक गेले होते. त्याच्या मग चालता चालता मनात आलं, ' जिवाला बरं नसल्यागत मळा दिसत हुता···सबंध माळावर कुठं झाड, डगरी, वारुळ कायबी दिसत नव्हतं ···आता माळावर ढोरं कशाला येतील नि पोरं तरी कशाला येतील ?···चला ! रगड झालं आता. आता नगंच व्हायला. समदा गोतावळा घेऊन असंच माळानं माळ हुडकत जाऊ. हितं आता कोण हाय आपलं ?' आणि पाय गळाटल्याने तो भर उन्हातच तिथंच परसाकडला बसला. पोटात अधिकच ढवळाया लागलं. भवतीनं रानच्या रान फिरू लागलं. सारी रानं. रानं. रानं ! या रानातच आपली माती व्हावी असं वाटू लागलं. आणि त्याला भोवळ आल्यासारखे झाले. ' एका रानाची साठ रानं दिसू लागली. '

**प्रश्न. १–' गोतावळा ' कादंबरीच्या कथानकाचे स्वरूप व वैशिष्ट्ये थोडक्यात सांगा.**

किंवा

**कथानकदृष्टया गोतावळा कादंबरीचे वेगळेपण कोणकोणत्या गोष्टीत जाणवते ते सोदाहरण स्पष्ट करा.**

**उत्तर :–** (१) गोतावळाचे कथानक काय असा प्रश्न विचारला तर असे म्हणता येईल की एका शेतात मशागतीसाठी ट्रॅक्टर यायचा असतो; व तो येतो. आणि त्यासाठी मळयात असणारी सारी जनावरे 'वाटेला' लावली जातात. पण खरे म्हणजे पारंपरिक मराठी कादंबरीमध्ये 'घटना' या शब्दाला जे रुप व अर्थ प्राप्त झालेला आहे; त्याअर्थाने या कादंबरीत एकादी घटना घडत नाही. नारबाचे जीवनचित्र ही कादंबरी रेखाटू पाहते आहे; असे म्हणावे तर सर्वार्थाने तेही बरोबर ठरणार नाही. एकसुरी व तोच तोपणा असलेल्या नारबाच्या जीवनात घटना त्या काय असणार अन् कसल्या असणार? म्हणून चित्तवेधक घटनांच्या कलात्मक गुंफणीमुळे ही कादंबरी आपण अनिमिष नेत्राने वाचतो वा आस्वादतो असे आपणास म्हणता येणार नाही. म्हणून कथानक दृष्टया घटनांना प्राधान्य न देता कथा उलगडत जाते व "त्याद्वारेच आपण जीवनाच्या अनाकलनीय परंतु तितक्यात उत्कट भासणाऱ्या गाभ्याला स्पर्श करीत असतो" असे जे प्रा. वा. ल. कुलकर्णी (प्रतिष्ठान–मार्च १९७२) म्हणतात. ते कथानकदृष्टया एक मौलिक वैशिष्टच म्हटले पाहिजे. दुसऱ्या शब्दात असे म्हणता येईल की चित्रविचित्र नि रंगीबेरंगी अशा घटनांची साखळी गुंफून त्यातून कथानक साकार न करता जीवनाची अज्ञात पाने लेखकाने वाचकांसमोर वाचण्यासाठी उलगडून ठेवलेली आहेत. घटनांना प्राधान्य न देता कादंबरी आविष्कृत केलेली आहे, हे कथानकाच्या दृष्टीने तिचे पहिले वैशिष्टय म्हणता येईल.

(२) एवढेच नव्हे तर ज्या घटना नारबाच्या जीवनाशी निगडीत असून प्राण्यांच्या जीवनात घडतात; त्याचे क्षितिजाच्या किनाऱ्यावर टेकलेल्या चांदण्याचे ठिपके जसे हळूहळू क्षितिजाच्या पोटात सामावले जातात; तसे या कादंबरीत प्राण्याच्या जीवनातील घटना हळूहळू लोप पावतात. एका घटनेतून दुसरी घटना, दुसरीतून तिसरी घटना अशी शृंखला साकार करण्याऐवजी रांगोळीचे सुटे सुटे ठिपके एका कलात्मक नजरेने आकर्षक रीतीने मांडावेत तशी कथानकाची रचना आहे. सलग असून एकरूप झालेले आणि एकरूप भासून अलग असणारे असे या कथानकातील घटनाचे स्वरूप आहे. आणि त्यामुळेच तोच तोचपणा वरवर भासत असला तरी कथानकाला ताजेपणा आणि अस्सलपणा प्राप्त करून दिलेला आहे. म्हणून प्रा. अरविंद वामन कुलकर्णी कथानकातील घटनांच्या संदर्भात लिहितात, "या कादंबरीतील साऱ्याच घटनाना **एक भावनात्मक बैठक देऊन** ताजे बनविणाऱ्या शोकात्म धाग्याला यादवांनी नारबा आणि मालक यांचे दोन विरोधी ताण देऊन आणखीनच रंग भरलेला आहे." (प्रतिष्ठान–मार्च ७२,) म्हणून कथानकदृष्टया भावनात्मक बैठकीच्या आधारे निर्माण केलेले सूक्ष्म संघर्षाचे ताण व त्या ताणाच्या विणीतून निर्माण

झालेल्या शोकात्मक भावनेच्या ठिणग्या हे या कादंबरीच्या कथानकाचे आणखी एक वैशिष्टच मानले पाहिजे.

(३) सामान्य वाचकांचे मनोरंजन करणाऱ्या ज्या कादंबऱ्या आपण आजकाल वाचतो. त्यामध्ये प्रा. फडक्यांनी घालून दिलेली कादंबरी रचनेची जी वैशिष्टचे असतात ती या कादंबरीत बिलकूल आढळत नाहीत. प्रा. फडक्यांनी कादंबरीचे तंत्र म्हणून ज्या काही गोष्टी नवशिक्या लेखकाला सांगितल्या आहेत. त्या येथे नाहीत. त्यामुळे आकर्षक प्रारंभ, चटका लावणारा शेवट, नाजूक व चकवा देणारे रहस्य, निसर्गचित्रणाचा भावना परिपोष करण्यासाठी केलेला कृत्रिम वापर, कथानकाची गाठ, निरगाठ, उत्कर्ष बिंदू आणि कलाटणी यासारख्या ढोबळ तंत्राच्या कृत्रिम चौकटीत ही कादंबरी सामावू शकत नाही. 'गोतावळा' मध्ये कृत्रिम कलाटणी नाही. प्रसंगांची गाठ–निरगाठ नाही. मुद्दाम अलंकारिकता आणलेली नाही. घटनांवर वाचकांचे लक्ष केंद्रित व्हावे व त्यातून त्याचे मनोरंजन घडावे हा हेतु नाही. मुद्दाम पेच निर्माण केलेला नाही अथवा प्रादेशिक वातावरणाचा रुचिपालट म्हणून वापरही केलेला नाही. मातीतून एखादा अंकुर जितक्या स्वाभाविक नि सहजपणे तरारून वर यावा, अथवा झाडाची गर्द काळी छाया तितक्याच गर्द–गहिऱ्या असलेल्या डोहात जितकी सहजपणाने पडावी; अथवा एखाद्या कळीचे उत्फूल्ल पुष्पात जितक्या स्वाभाविकपणे विकसन व्हावे तितक्या सहजतेने, तितक्या स्वाभाविकपणे अन् अकृत्रिमतेने हे कथानक उमलत जाते–अखेरपर्यंत उमललेले असते. मातीत राबणारा नारबा, मातीच्या कुशीत विसावणारी नि मातीवरच जगणारी जनावरे यांच्या नकळत जडलेल्या भावबंदाची, अर्थातीत स्नेहाची आणि त्यातून जन्मणाऱ्या अपार सहानुभूतीची ही कथा आहे. नारबाचे पोरकेपण व प्राण्यांचे पोरकेपण यांच्या गाढ स्नेहातून साकार झालेल्या एका अपूर्व जीवनाची ही कथा आहे. म्हणूनच बंदिस्त नि निष्प्राण करणाऱ्या साचेबंद कथानकाच्या चौकटीत न मावणारे हे कथानक आहे. नव्हे, त्या कथानकाला आव्हान देऊन त्याला लवचिक करणाऱ्या व कथानकाच्या रेषा रुंदावणाऱ्या घटनाविहीन अनुभूतीच्या संवेदनाक्षम मनाने केलेला हा एक अपूर्व आविष्कार आहे. कथानकाला क्षुद्रत्व देणारी ही कादंबरी आहे. हे तिचे आणखी एक नमूद करण्याजोगे वैशिष्टच मानले पाहिजे. म्हणूनच रणांगण व पडघवली या कादंबरीनंतरची एक लक्षणीय कादंबरी आहे असा निर्वाळा अनेक समीक्षकांनी दिलेला आहे.

(४) या कादंबरीचे आणखी एक लक्षणीय वैशिष्टच म्हणजे तिच्यात असलेली वास्तवता. या वास्तवतेमुळे कथानकाला वेगळेपणा आलेला आहे. यादवांनी आपल्या या कथावस्तूला कल्पकतेची झालर जराही लावलेली नाही. कल्पनेच्या साहचाने काही नवीन प्रसंग घालून ती अधिक परिणामकारक करण्याचा मोह त्यांनी पूर्णपणे टाळलेला आहे. नारबापासून तो नाम्यापर्यंत; आणि शेतमळ्याच्या वर्णनापासून तो प्राण्यांच्या सूक्ष्म चित्रणापर्यंत जे जे अव्वल व अस्सल आहे ते ते त्यांनी आपल्या कथात्मक प्रतिभेने टिपून

घेतलेले आहे. म्हणजेच सत्यातून सौंदर्याचा आविष्कार केलेला आहे. मातीलाच सुवर्णाची कांती प्राप्त करून दिलेली आहे. सत्य आणि कल्पित यांच्या मुशीतून साकार होणारे सौंदर्य यादवांनी बाजून सारून Truth is beauty हे वचन साकार केलेले आहे. म्हणून अव्वल अन् अस्सल वास्तवतेच्या गाभ्याला त्यांनी हात घातलेला आहे. ' गोतावळा ' मधील नारबा व त्याची अगतिक वृत्ती सार्वत्रिक व वास्तव आहे. गड्याला करावी लागणारी कामे व त्याला मिळणारी वागणूक सत्य आहे. शेत–मळयाचे वर्णन, पिकांचे वर्णन प्राण्यांचे वर्णन हे देखील अगदी चित्रस्पर्शी आणि वास्तव असेच आहे. ही वास्तवता अन् हे ग्रामजीवन त्याच्या लय, सूर, रूप आणि बंदिश यांच्यासह त्यांनी शब्दांच्या कुंचल्यांनी रेखाटलेले आहे. म्हणून कथानकदृष्टचा ती वेगळी वाटते. प्राण्यांच्या मृत्यूवेळी–जेव्हा ते एकामागून एक घडतात, तेव्हा तेथे कृत्रिमता व सहेतुकता दिसते खरी; पण तेही स्वाभाविक म्हणता येईल. त्याबद्दल स्वतः लेखकच म्हणतो की, " या कादंबरीतील मृत्यू तसे अस्वाभाविक व मुद्दाम घडवल्यासारखे वाटत असले तरी तसे नाही. एक तर ही कादंबरी अनेक पातळ्यावर कार्य करते. ट्रॅक्टरच्या निमित्ताचे नारबाचे भावविश्व उध्वस्त झालेले असल्यामुळे प्राण्यांचे मृत्यूदेखील अत्यंत स्वाभाविकपणेच स्वीकारले जात असतात. आणि नारबाचे विश्व प्राण्यांच्या भावविश्वाशी एकरूप झालेले असल्याने तो हे मृत्यू तितक्या सहजरीतीने स्वीकारू शकत नाही. आणि ' गोतावळा ' हा विषयच असा आहे की, नारबाचे भावविश्व जणू या प्राण्यांच्या निमित्ताने ढासळत चाललेले आहे. जणु तो त्यांच्याबरोबर स्वतःही अंशाअंशाने कणाकणाने मरत आहे. या दृष्टीने तुम्ही त्या प्राण्यांच्या मरणाकडे बघाल तर घटनांची योजना हेतुपूर्वक आहे असे वाटणार नाही. " (ललित : जून १९७३). म्हणूनच वास्तवतेलाच सौंदर्याचे आणि शाश्वततेचे दिलेले रूप म्हणजे ' गोतावळा ' कादंबरी होय असे आपणास म्हणता येईल.

(५) कथानकाच्या स्वरूपाचा विचार करता या कादंबरीचे आणखी एक वेगळे स्वरूप आपल्या ध्यानी येते. ते म्हणजे ह्या कादंबरीची रचना कथानक दृष्टचा व्हर्टिकल (Vertical) पायऱ्या पायऱ्यांनी वरवर उंचावत जाणारी नाही. तर ती हॉरिझाँटल (Horizontal) स्वरूपाची आहे. म्हणजे वर्तुळाकार रूप धारण करणारी आहे. एका बिंदूपासून निघून ती चक्राकार फिरत फिरत शेवटच्या बिंदूला स्पर्श करून संपते. प्रसंग अथवा घटना एकावर एक अशा रचलेल्या नाहीत. तर एकाला एक अशा लावून ठेवलेल्या असल्याने एकाद्या टेकडीवरून जसा क्षितिजाचा अर्धगोल आपणास जाणवतो, तसे जीवनाचे स्वरूप या कादंबरीतून आपणास प्रतीत होते आहे. त्यामुळेच या कादंबरीतील एखादे सुटे प्रकरण वाचले तरी रसास्वादाला कोठे व्यत्यय येत नाही आणि साखळी तुटल्याप्रमाणे भासत नाही. आणि त्यामुळेच इतर कादंबऱ्यामध्ये जी एक झपाटून टाकणारी झंझावाती गती असते, ती गोतावळा वाचताना प्रत्ययाला येत नाही. याचे कारण कथानकाचा रचनेच्या दृष्टीने वेगळा असणारा आकृतीबंद हेच आपणास दिसून येईल.

(६) कथानकदृष्टया आणखी एक वैशिष्टय म्हणजे या कादंबरीचे स्वरूप नारबाच्या डायरीसारखे आहे. त्याला जे जे अवती–भोवती दिसते, भासते, घडते त्यांचे साद–पडसाद त्याच्या मनावर उमटतात. व तोच याचा निवेदक असल्याने या कादंबरीचे स्वरूप नारबाच्या एक वर्षांच्या डायरीसारखे जाणवते. नारबाचे गुराढोरांशी जे भावसंबंध जडलेले आहेत त्यांचे कथन करताना न कळत आपले भावजीवनही स्पष्ट करतो आहे. म्हणूनच प्रा. वा. ल. कुलकर्णी लिहितात, ‘ नारबा जी आपली कहाणी चित्रित करतो आहे ती जवळ जवळ त्याची दैनंदिनीच आहे. अनेक प्रकरणांची सुरवात ‘आज उजाडल्यावर उठलो. ’ ‘ पहाट झालेली दिसते ’ ‘ सकाळनं उठून ढोरांचा शेणं भरली. ’ अशीच झालेली आहे. तिच्या ओघात घडलेली आहे. म्हणून ही कादंबरी म्हणजे नारबाच्या भावविश्वास जात असलेल्या तडयांची कहाणी वाटते. त्याच्या वेदनेची कहाणी वाटते. तर दुसऱ्या अंगाने प्राण्यांच्या चैतन्यशील जीवनाचे अंतिम रूप–मृत्यू–चित्रित झालेले आहे. हा देखील विशेष म्हटला पाहिजे. तरीही दैनंदिनीत येणारा तोच तोपणा या कादंबरीत नाही. अथवा दैनंदिनीमुळे पडणाऱ्या जीवनाविष्काराच्या मर्यादाही येथे जाणवत नाहीत. नारबाच्या जीवनात–मनात–होणाऱ्या प्रतिक्रियांची, भावतरंगाची ती दैनंदिनी आहे व हे माध्यम अशा वेगळया स्वरूपात वापरण्याच्या कौशल्यामुळे कादंबरीच्या कथानकाला एकापेक्षा अधिक परिमाणे लाभलेली आहेत. आत्मकथन आणि आत्मगत केलेल्या प्राण्यांच्या वेदनांचे कथन असा दुहेरी गोफ विणून कथानकाची जडण–घडण लेखकाने साधलेली आहे.

७) कथानकाच्या संदर्भात घटनांना प्राधान्य न देता देखील लेखकाने दोन प्रकारची दुःखे एकात्म केलेली आहेत आणि ते एकजीव केलेले दुःख शोकात्म स्वरूपात अखेरीस पर्यवसित केलेले आहे. नारबाचे दुःख आणि प्राण्यांचे दुःख यांची कूस आणि मूस वेगवेगळी असूनही त्याचा एक संघ असा मिलाफ लेखकाने केलेला आहे. त्यामुळे कादंबरीचा शोकांत शेवट आपले मन उदास करणारा आहे. परंतु हा शेवट आपल्या मनावर एवढा परिणाम करून जातो त्याचे कारण लेखकाने संपूर्ण कादंबरीभर केलेले दोन दुःखाचे एकात्म चित्रण होय. हे चित्रण करताना कोठे वर्णनाकरिता वर्णने केलेली नाहीत. घटनांची खास गुंफण साधून त्यातून एखादे चित्तथरारक कथानक निर्माण केलेले नाही. डोळयात भरावीत अशी चित्तवेधक व्यक्तिचित्रणे केलेली नाहीत. तरीही कथनरूपाने सांगणाऱ्या गोष्टीरूप कथानकाची गरज भासत नाही. ती उभी आहे. जीवसृष्टीत व्यक्त होणाऱ्या जीवननाटयात !

८) प्रा. अरविंद वामन कुलकर्णी यांच्या मते (प्रतिष्ठानः मार्च ७२) गोतावळयाच्या साऱ्या लेखनाचे स्वरूप Reportage चे आहे. त्यामुळे नारबाला जवळ जवळ एखाद्या कॅमेऱ्याचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. व तो कॅमेरा वैचित्र्य नसलेले, स्थिर असलेले

वेगळे असे चित्रप्रदर्शन आपल्यासमोर उलगडून दाखवतो आहे. म्हणूनच जे अशक्य आहे ते लेखकाने आव्हान स्वीकारून शक्य करून दाखविले आहे.

[सारांश कथानकदृष्टचा या कादंबरीत मुद्दाम आणलेली भावविवशता नाही. भडकपणा नाही. कृत्रिमता नाही. अनेक परिमाणे देऊन अर्थांची अनेक वलये निर्माण करण्यात हे कथानक कमालीचे यशस्वी झालेले आहे. कोणत्याही एखाद्या विशिष्ट तत्त्वज्ञानाचे समर्थन करण्यासाठी कथानक 'राबवले' नाही. कथानकाचा तोल बिघडू दिला नाही. गाभ्याला हात घालूनच जीवनाची गती, लय, व रूप साकार केलेले आहे.] अनेकदा सूचकता वापरून आशयाला अर्थगर्भ बनविले आहे. निसर्गाला स्पर्शाने अधिक लवचिक बनविले आहे. म्हणून कथानकाच्या दृष्टीने 'गोतावळा'चे कथानक हे डॉ. भा. दि. फडके यांच्या शब्दात, 'गोतावळा' सारख्या कादंबरीने मराठी कादंबरीचे क्षितीज विस्तारले आहे हे निःसंशय !" (ललितः एप्रिल १९७२)

तरीही 'गोतावळा, कादंबरीचे परीक्षण करताना श्री. प. श्री. नेरूरकर यांना कथानकदृष्टचा खूपच उणीवा जाणवल्या आहेत. 'धरती' मासिकाच्या मार्च १९७२ च्या अंकात या कादंबरीच्या गुणावगुणांची मीमांसा करताना ते लिहितात. "गोतावळा या कादंबरीतील कथावस्तू प्रारंभापासून शेवटपर्यंत कथावास्तवालाच हरवून बसली आहे. म्हणूनच 'पुत्र' (मनोहर शहाणे.) प्रमाणेच ती नारबाच्या जीवनातील त्याला घेऊन राहणाऱ्या समाजबांधणीतील सतत त्याच्या जवळपास व अंतर्यामी खोल खोल वातावरणाच्या दारुण अनुभाविक सत्यापासून पळते व वास्तवाला नेमकी टाळते. एक जिवंत प्रत्ययकारी कलाकृती व कलावस्तू म्हणून फसते. कादंबरीचा सगळा आशयच लेखकाने कोणत्यातरी फसव्या व चकव्या अशा शैलीच्या विरविरीत जाळ्यातून पकडण्याचा अ–बांधील (non-, committed) साहित्यिक प्रयत्न केलेला आहे. तो केवळ प्रयत्न आहे. प्रयोग नाही. त्यामुळे एका बंदिस्त चौकटीत ही कादंबरी अडकून बसते. (धरतीः मार्च १९७२)

('गोतावळा' कादंबरीच्या लोकप्रियतेची मीमांसा करताना वरील प्रश्नाचा आधार विद्यार्थ्यांनी घ्यावा.)

**प्रश्न २– "आनंद यादवांच्या 'गोतावळा' कादंबरीतील प्रसंगांत तसा तोच तोपणा जाणवत असला तरी त्यात ताजेपणा असतो." स्पष्ट करा.**

**अथवा**

**"यादव कोणत्याही एखाद्या प्रसंगाचे मर्म पकडतात ते त्याच्या लयीसह" या विधानाचा 'गोतावळा' कादंबरीच्या संदर्भात परामर्श घ्या.**

**अथवा**

**'गोतावळा' कादंबरीतील प्रसंगाचे स्वरूप स्पष्ट करून त्यातील गुणदोषांची मीमांसा करा.**

**उत्तरः**– कथानकदृष्टचा ' गोतावळा ' कादंबरी तशी काही खास वैशिष्टचाने नटलेली आहे; तशीच प्रसंगचित्रणाच्या दृष्टीने तिने काही वेगळे वैशिष्टच निर्माण केलेले आहे. कथानकाची निर्मिती ज्या प्रसंगांच्या साहचाने व माध्यमातून होते; ते प्रसंग चित्रित करताना यादवांनी आपले वेगळेपण कळत वा नकळत प्रत्ययाला आणून दिलेले आहे. आणि त्यामुळेच या कादंबरीचा घाट इतर कादंबरीपेक्षा वेगळचा स्वरूपाचा जाणवतो. प्रसंगांची निवड, त्यांची मांडणी, त्याचे चित्रिकरण आणि त्यामागील कलात्मक हेतू याविषयी त्यांनी आपला स्वतंत्र असा दृष्टीकोन ठेवलेली कादंबरी वाचताना आपल्या प्रत्ययाला येतो. तसे पाहिले तर या कादंबरीतील प्रसंग सामान्य भासत असूनही असामान्य स्वरूपाचे वाटतात. अशा या प्रसंगांद्वारे लेखकाने कादंबरीक्षेत्राची कक्षा रुंदावली आहे याचाच आता थोडक्यात विचार करावयाचा.

(१) त्या दृष्टीने विचार करता या कादंबरीतील प्रसंग मूळतः सामान्य माणसाच्या जीवनात–नित्य जीवनात घडणारे प्रसंग आहेत. अनेकदा कादंबरीकार अपवादात्मक जीवनातील अपवादात्मक प्रसंगांचा वापर करून त्याद्वारे एक चित्तथरारक असे कथानक उभे करीत असते. चंद्रकांत खोतांच्या दोन्ही कादंबऱ्या अशाच समाजजीवनातील अपवादात्मक घटनेवर आणि व्यक्तीवर आधारलेल्या आहेत. ज्याच्या मेंदूत बिघाड झालेला आहे असा एक नायक आणि त्याच्या मुखातून बाहेर पडणारी मुक्ताफळे याचा पंचनामा चंद्रकांत खोतांनी ' बिनधास्त ' कादंबरीत केलेला आहे. त्यादृष्टीने एका शेतमजुराचे एका सुगीतले जीवन; त्याच्या त्या साचेबंद जीवनात घडणाऱ्या घटना; आणि जीवनाशी निगडीत असणाऱ्या घटना साध्या, नेहमीच्या आणि सार्वत्रिक अशा आहेत. प्रसंगांची निवड करताना मुद्दाम नाटचमयता आणलेली नाही. साध्याही विषयांत–प्रसंगात काव्यमयता असते हे यादवांनी दाखवून दिलेले आहे.

२) एवढेच नव्हे तर त्यांनी जे प्रसंग चित्रित केलेले आहेत त्यात प्रसंगांना गौणत्व दिलेले आहे. म्हणून गोतावळा कादंबरी जे काही घडते ते थोडे. पण जाणवते ते मात्र खूप असे त्याचे स्वरूप राखलेले आहे. प्रसंगाना चित्ररूप देण्याऐवजी, अथवा एखादा प्रसंग जसाच्या तसा साक्षात करण्याएवजी त्याच्या बाह्यचित्रणाऐवजी आंतर सौंदर्याला यादवांनी हात घातलेला आहे. प्रसंगाच्या गाभ्यात असलेले जे मूलभूत सौंदर्य असते. त्यालाच त्यांनी हात घातला, आणि तो सौंदर्यात्मक गाभा जशाच्या तशा स्वरूपात अविकृत रूपात सौंदर्याच्या भाषेतच आविष्कृत केलेले असतात. त्यामुळेच या कादंबरीला ताजेपणा प्राप्त झालेला आहे. नारबाचे लेखकाने स्थिर चित्रण आणि जवळ जवळ एकसुरी भासणारे प्रसंग या कादंबरीत असूनही यादवांनी प्रसंगात ताजेपणा राखलेला आहे. आणि ताजेपणा येण्याचे कारण ते प्रसंग साकार करतात ते त्याच्या लयीसकट ! मग तो प्रसंग विहिरीतील गाळ काढण्याचा असो, ढोरांच्या विक्रीचा असो, चंपीच्या मृत्यूमुळे पोरक्या झालेल्या नाम्याने केलेल्या आत्मर्पणाचा असो, अथवा पाडीच्या नादाने पेटलेल्या सोन्या–चाण्याचा

असो–यादवांच्या लेखणीचे भान सुटत नाही. शब्द वा कल्पना सुटचा मण्यासारख्या विखरत नाहीत. म्हणून प्रा. अरविंद वामन कुलकर्णी म्हणतात, 'गोतावळा कादंबरीच्या प्रत्येक प्रसंगातील लयीचे आरोह अवरोह साधीत त्यांचे शब्द व कल्पना नेमून दिलेल्या जागा अतिशय सहजपणे घेतात.' (प्रतिष्ठान मार्च १९७२) या प्रसंगाचे विश्लेषण करताना श्री. प्रभाकर पाध्ये यांनी देखील त्यांची कादंबरी मर्ढेकरांच्या लयतत्वात सहज बसवून दाखवता येते असे विधान केलेले आहे. (केसरी ५ सप्टेंबर १९७१) एवढेच नव्हे तर श्री. पाध्ये यांनी प्रसंगाची चिकित्सा करताना मोठचा कौतुकाने असे म्हटले आहे की 'या कादंबरीतील बहुतेक सारे प्रसंग यादवांना जसे प्रत्यक्षात माहीत होते, तसे इतर असंख्यांना माहीत असतील. पण यादवांनी ते नारबाच्या विशिष्ट जीवनात आणि मनात भिनवून टाकले या कादंबरीत आलेले बहुतेक सारे प्रसंग नारबाच्या भावविश्वात शिरताना त्यांच्यावर कल्पनाशक्तीचे संस्कार झाले. त्यांचा प्रत्यक्ष जीवनातील संदर्भ सुटला आणि नारबाच्या भावविश्वाचा नवा संदर्भ त्यांना मिळाला. या कार्यात आनंदरावांनी अपरिमित आणि आगळे यश मिळविले आहे.' (केसरी २९ ऑगस्ट १९७१). याचाच अर्थ प्रसंगाचे कलात्मक संक्रमण करणे आणि ते करीत असताना त्याच्या सोलीव गाभ्याला महत्त्व देऊन त्याचाच तेवढा सौंदर्यात्मक असा छेद शब्दांच्या साह्याने कादंबरीच्या माध्यमांतून व्यक्त केलेला आहे. म्हणूनच प्रसंगदृष्टचाही या कादंबरीचे वेगळेपण मान्य करावे लागते.

३) त्यामुळेच यादवांना संघर्षाने पेटलेले आणि पेटवणारे असे प्रसंग घेण्याची गरज भासली नाही. या कादंबरीत संघर्ष नाही असे नाही. नवे जुने–पारंपारिक–पुरोगामी, मालक–नोकर, मानव विरुद्ध यंत्र, मानवता विरुद्ध व्यवहार यांचा संघर्ष याही कादंबरीत आहे. पण हा संघर्ष उघडावाघडा करून त्याला ज्वालाग्राही आविष्काराचे प्रकाशमान रूप दिले नाही. संघर्षाच्या लालबुंद ठिणग्यांचा नेत्रदीपक जल्लोश साकार करून वाचकांना स्तीमीत करणारे प्रसंग यादवांच्या दृष्टीने तात्कालिक परिणाम साधतात. या कादंबरीतील प्रसंगांच्या पोटात संघर्ष आहे, पण तो ओठावर आणलेला नाही. प्रसंगात असलेला संघर्ष तसाच सूचित करण्यावर त्यांचा विशेष भर दिसतो. महासागराच्या पोटात जसा एखादा आतून वाहणारा गरम पाण्याचा झरा असावा अन् वरती मात्र बर्फाचे हिमखंड तरंगावेत तशी अवस्था या कादंबरीतील प्रसंगांच्या संघर्षासंबंधी घडलेली आपणास जाणवते. त्यामुळे अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' जशी तलवार आणि बंदुकाच्या निनादाने व खणखणाटाने गजबजून जाते, रक्ताने माखून गेलेली दिसते तसे या कादंबरीबाबत घडलेले नाही. येथे नारबाच्या जखमा ठणकतात. पण बाहेर रक्त येण्यापूर्वीच त्याच्या आतल्या आत गाठी बनतात. अन् झालेल्या गाठीच उघडा संघर्ष नसताना देखील वाचकाला अस्वस्थ करून सोडतात. म्हणून संघर्षाचा वापर सरळ सरळ न करता त्याला वेगळ्या स्वरूपात अविष्कृत करीत ही कादंबरी उमलत जाते. हे प्रसंगचित्रणाच्या संदर्भात वेगळेपणाच सिद्ध करीत नाहीत काय ?

४) 'गोतावळा' चे प्रसंगदृष्टचा आणखी एक वैशिष्टच म्हणजे यामधील प्रसंग एखाद्या विशिष्ट सूत्रात गुंफलेले नाहीत. एखाद्या वाचकाला तसे सूत्र प्रतीत झाले तरी ते कमालीचे अस्पष्ट आणि परिवेष्टित असे आहे. प्रसंगांची गुंफण न करता ते सुटे सुटे चित्रित ठेवूनही त्याला कलात्मक सलगता प्राप्त करून दिलेली आहे. म्हणून एखाद्या उदाहरणाने सांगायचे झाले तर असे म्हणावे लागेल की, या कादंबरीतील प्रसंगांचे स्वरूप रात्रीच्या वेळी दिसणाऱ्या आकाशगंगेच्या तारकांप्रमाणे आहे.–त्यातील प्रत्येक तारका सुटी असून पहाणाऱ्याला एखाद्या पुष्पगुच्छासमान भासते.

५) त्यामुळेच या कादंबरीत वाचकांना म्हणावा तसा क्लायमॅक्स प्रतीत होत नाही. तसा क्लायमॅक्स आहे; पण थक्क करीत नाही. उजाड झालेला माळ, ढोरांनी व गजबजलेला मळा आणि मालकांशी पूर्णतः दुरावलेले नारबाचे नाते व त्यामुळे त्याच्या मनाची होणारी कालवाकालव ही क्लायमॅक्सच्या स्वरूपाची भासली तरी ती कादंबरीच्या पूर्वचित्रणाचा अपरिहार्य असा कलापूर्ण परिपाक आहे. तो मुद्दाम ओढून–ताणून केलेला अथवा घडवलेला नाही. साखळीची प्रत्येक कडी जशी दुसऱ्या कडीत गुंफलेली असते व म्हणून ती अलग असूनही विलग होऊ शकत नाही; तसे या कादंबरीतील प्रसंगाच्या बाबतील झालेले नाही. त्यामुळेच यातील एकेक प्रकरण म्हणजे एकेक गद्यकाव्य वाटते. आणि म्हणूनच कदचित असेल गोतावळा खरे तर एक रसाळ काव्य आहे. आणि ते अस्सल आहे कसदार शब्दाने फुलत–फुलत गेलेले आहे. असा अर्थपूर्ण अभिप्राय ना. प्र. आवटी या समीक्षकाने काढलेला असावा. (साधना साप्ताहिक : ९ ऑक्टोबर १९७१). अन् तो तसा योग्यही आहे.

६) याशिवाय आणखी एक प्रसंग वैशिष्टच म्हणजे 'गोतावळा' मधील प्राण्यांच्या जीवनाशी निगडीत असलेले सारे प्रसंग एखाद्या 'पिक्चरगॅलरी' सारखे चित्रित केलेले आहेत. आणि त्याचे तंत्रही Fade up पद्धतीचे जाणवते. यादवांनी उभा केलेला एक प्रसंग वाचताना मागचा प्रसंग मनावर उमटूनही क्षीण बनलेला असतो. त्याच्या परिणामाची छाया खोलवर गेलेली नसते. पण वाचत असलेला प्रसंग मात्र कळीच्या पाकळ्या हळूहळू उमलाव्या तसा मनासमोर साऱ्या रंग–रूपासह उमलतो. त्यानंतर पुन्हा त्यापुढचा प्रसंग वाचू लागलो की मागचा उमललेला प्रसंग सायंकाळी कमळ पाकळ्या मिटाव्यात तसा धसफस न करता मिटतो. पाडीच्या नादाने आपल्या पुरुषत्वाची प्रखर जाणीव झालेले बैल आणि त्यांनी घातलेला गोंधळ आपण वाचत असताना तो प्रसंग अक्षरशः मनासमोर उभा राहतो; पण त्यानंतर मधमाशांनी रेडकांचा घेतलेला चावा मनासमोर येतो. विहिरीत पडलेला घोड्याच्या वेदना मनाला डसतात न डसतात तोच त्याच्या पुढचा प्रसंग मनाची पकड घेऊन मोकळा होतो. म्हणून या कादंबरीताल प्रसंग म्हणजे आवाज न करीत वाहणाऱ्या पाण्यावर टम्म फुगलेल्या बुडबुड्यांच्या मालिकेसमान वाटतात. आणि तरीही त्याचा तुटकपणा आपणास जाणवत नाही. हेच यांचे खास वैशिष्टच म्हटले पाहिजे.

७) याखेरीज प्रसंगाचे केलेले सूक्ष्म आणि वास्तव चित्रण हेही एक विशेष मानला पाहिजे. सूक्ष्म चित्रणाच्या या वैशिष्ट्यावर अनेक टीकाकार बेहद्द खूष दिसतात. नामदेव ढसाळ, नारायण आवटी, मीनाक्षी रायकर, अरविंद कुलकर्णी, अनिल किणीकर, श्रीराम बोरकर, वा. ल. कुलकर्णी इ. अनेक समीक्षकांनी यादवांच्या प्रसंगचित्रणातील सूक्ष्मता बारकावे अन् वास्तवता वाखणलेली आहे. मोर, म्हैस, कासव, नाकतोडे, किडे, कोंबडे, मुंगळे, कावळे यासारख्या प्राण्यांचे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या प्रसंगाचे कमालीचे हृद्य असे चित्रण यादवांनी साधलेले आहे- हे चित्रण साधताना कल्पकतापूर्ण पण तितकेच देखणे असे अलंकारिक वाक्यही ते टाकण्यात विसरत नाहीत. त्यांच्या या सूक्ष्म चित्रणामुळे वाचकाचे कुतुहल दडपलेही जात नाही वा वाढवलेही जात नाही. ती सूक्ष्मता त्या प्रसंगाला अन् प्राण्याला सजीवता आणून देत असते. किंवा आपणास ग्रामीण जीवनाचे माहित असलेले सारे बारकावे सादर करुन दिपवून टाकावे अशीही तेथे भूमिका नसते. प्रसंगाच्या चैतन्याविष्कारासाठी सहजतया अंगभूत भाग म्हणून येणारी सूक्ष्मता तेवढीच लेखकाने पकडून शब्दबद्ध केलेली आहे. म्हणून हे देखील एक वैशिष्ट्य मानले पाहिजे.

८) या कादंबरीतील बहुतांशी महत्त्वाचे प्रसंग मृत्यूशी निगडीत झालेले आहेत. परंतु यातील मृत्यूचे स्वरूप एक नाही. काही निसर्गक्रमाने घडले आहेत. काही जिवाची उपेक्षा केल्याने झालेले आहेत. काही उपयुक्ततेच्या पोटी (कासवाचा मृत्यू) झालेला आहे. काही उच्च कोटीच्या प्रीतीचे दर्शन देऊन आत्मबलीच्या तेजाने उजळून निघाले आहेत. काही मुद्दाम झालेले आहेत. तर काही 'जिवो जीवस्य जीवनम' या शाश्वत तत्त्वाधारे घडलेले आहेत. म्हणून संपूर्ण कादंबरी म्हणजे सृष्टीक्रमातील मुक्या प्राण्यांच्या जीवन आणि मरण या दोन टोकातील वेदनेची कथा आहे असे वाटते. अथवा 'गोतावळा' कादंबरी म्हणजे जीवनाला लाभणाऱ्या अंताची नानविध रूपे सादर करून त्याची भीषणता व क्रूरता साकार करणारी कादंबरी म्हटली पाहिजे. अथवा गोतावळा कादंबरी म्हणजे जीवनाची क्षुद्रता प्रखरपणे पटवून देण्यासाठी मृत्यूची मालिका साकार करणारी कादंबरी म्हटले पाहिजे. म्हणून या कादंबरीत मृत्यू चित्रणाचे प्रमाण अधिक असे वाटते. अन् तसा आक्षेपार्ह सूर प्रा. शांता शेळके यांनी (ललित जून १९७३) यादवांची जी मुलाखत घेतलली आहे त्यावेळी काढलाही आहे.

९) आणखी एक शेवटचे वैशिष्ट्य म्हणजे या कादंबरीतील बरेचसे प्रसंग मानवी जीवनाशी निगडित झालेले नाहीत. तर प्राणी जीवनाशी निगडित आहेत. तरीही ते मानवी व प्राणी जीवनाचा 'पूल' म्हणजे माध्यम म्हणून कार्य करतात. यात घडणाऱ्या अथवा घडत असल्याप्रमाणे भासणाऱ्या प्रसंगात नारबाच्या प्रत्यक्ष आयुष्याशी निगडित असणारे किती ? स्वतः नारबाचे किती ? नारबा त्याच्या गोतावळ्यात गुंतल्यामुळे ते त्याच्याही सुखदुःखाचे प्रतीक बनतात हे खरे असले तरी निखळ विचार केला तर त्या

कादंबरीत प्राण्यांनीच खूप हातपाय पसरले आहेत असे म्हणावे लागेल. किंबहुना त्यांचीच ही कादंबरी आहे !

थोडक्यात, मानवी जीवन विरुद्ध प्राणी जीवन यांना भेद देणाऱ्या पातळयांचा एकाच वेळी आविष्कार करणारे; सौंदर्यलक्षी, संघर्षांना पोटात सामावून स्वतंत्र नि स्वयंभू असूनही नाते जोडणारे, सुक्ष्म निरीक्षणाची साथ असलेले कलात्मक प्रसंग आणि त्याची सुजाणपणे व वैशिष्टयपूर्ण अभिव्यक्ति करणारे प्रसंग हे या कादंबरीच्या यशाचा फार मोठा घटक आहे. यात काडीमात्र शंका नाही.

**प्रश्न ३ :– प्रादेशिक कादंबरीचे वेगळे कशात असते ? गोंतावळा ही त्या दृष्टीने प्रादेशिक कादंबरी ठरेल काय ?**

**अथवा**

**एक अव्वल आणि अस्सल प्रादेशिक कादंबरी या दृष्टीने गोतावळा कादंबरीचे मूल्यमापन करा.**

**अथवा**

**" जिला खऱ्या अर्थाने प्रादेशिक कादंबरी म्हणता येईल अशी मराठीतील गोतावळा हीच एक प्रादेशिक कादंबरी आहे " (नामदेव ढसाळ) या विधानाचा परामर्श घ्या.**

**उत्तर :–** साधारणतः १९४७–४८ पासून मराठीमध्ये प्रादेशिक कादंबऱ्यांचे एक नवे दालन-पेंडसे–दांडेकरांनी निर्माण केले. त्यांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप लक्षात घेतले तर आपणास असे दिसून येईल की एखाद्या विशिष्ट प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर त्या प्रदेशांच्या मातीतून वर आलेली, आणि त्या प्रदेशातील स्थिती संस्कृतीचा संस्कार झालेली अनुभूती त्याच वातावरणात विचित्र करणे स्थूलपणे प्रादेशिक कादंबरी ठरते. अस्सल प्रादेशिक कादंबरीत केवळ एखाद्या प्रदेशाचे रेखीव आणि सूक्ष्म चित्रण केलेले नसते. अथवा प्रादेशिक कादंबरीमध्ये केवळ नद्या, नाले, वनश्री आणि तेथील माणसे यांचे रचिपालट म्हणून चित्रण करणे अभिप्रेत नसते. चांगल्या प्रादेशिक कादंबरीत त्या मातीच्या संस्काराने घडविलेल्या मानवाचे आणि रीतीरिवाजांचे, आचार, विचारांचे विशाल संस्कृतीच्या संदर्भात जे वेगळेपण असेल ते साकार करणे. अस्सल ग्रामीण जीवन जगणाऱ्या माणसाचे प्रादेशिक कादंबरीतील चित्र त्या प्रदेशाने घडविलेले असते. त्याच्या श्वासःनिश्वासाला तेथल्या मातीचा स्पर्श झालेला असतो. त्याच्या रक्तात त्या निसर्गाचा अंश उतरलेला असतो. त्याच्या बोलीत त्या प्रदेशातील शब्दाची पखरण झालेली असते. त्याचे कपडे–लत्ते आणि सणसोहळे हे त्या प्रदेशातील संस्कृतीच्या अविभाज्य घटकाचा एक भाग असतो. किंबहुना तो प्रदेश आणि त्यांवर जगणारा माणूस यांच्या अविभाज्य नात्याची ती एक आविष्कृती असते. भूमीने घडविलेल्या भूमीपुत्राच्या जीवनातील बाह्य

आणि आंतरिक स्पंदने शब्दांकित करणे म्हणजे खऱ्या अर्थाने प्रादेशिक कादंबरी लिहिणे होय.

२) परंतु अलिकडेही ग्रामीण लेखन अनुभवक्षेत्राचा वेगळेपणा चित्रित करण्याच्या हेतुपोटीच लिहिले जाते. या प्रकारच्या लेखनात ग्रामजीवन अवतरते ते साधन म्हणून. साधन कशाचे तर लेखनाच्या सजावटीचे, बनावटीचे. अशा लेखनात कथनात्मक साहित्याच्या निर्मितीसाठी ग्रामजीवनाचा उपयोग केला जात आहे. याचीच केवळ जाणीव होते. र. वा. दिघ्यांच्या कादंबऱ्या अथवा ठोकळांची 'गांवगुंड' ही कादंबरी अशा प्रकारची असते. पण ऐकाद्या अनुभवक्षेत्राचा कथात्मक साहित्याच्या लेखनासाठी वापर करणे वेगळे व कथात्मक साहित्य विशिष्ट अनुभव क्षेत्रातून अपरिहार्यपणे जन्माला येणे वेगळे. प्रादेशिक कादंबरीत अशी अभिव्यक्तीची अपरिहार्यता असणे आवश्यक असते. या संदर्भात एक प्रादेशिक कादंबरी म्हणून 'गोतावळा' वेगळया स्वरूपाची वाटते. [या कादंबरीचे वेगळेपण विषय क्षेत्राच्या अपूर्वाईत नाही. तर त्यातून व्यक्त होणाऱ्या अर्थपूर्ण जीवनदर्शनात आहे. म्हणून प्रा. वा. ल. कुलकर्णी लिहितात " गोतावळा कादंबरीतील 'ग्रामीण' या शब्दाची कक्षा सीमित नाही. ते जीवन त्या पलिकडे झेपावते आहे. कादंबरी आपले ग्रामीणत्व न सोडता त्याचे अनन्यसाधारणत्व अबाधित राखून त्याच्या बाहेर झेपावते आहे. मराठी ग्रामीण कादंबरीला नव्हे तर मराठी कादंबरीलाच एक नवे परिमाण देण्याचा ती प्रयत्न करीत आहे. तिचा केवळ ग्रामीण ' कादंबरी ' म्हणून गौरव करणे वा कौतुक करणे हे ती जी साधू पहाते आहे त्याला गौणत्व देणे होय असे म्हणूनच वाटते." (प्रतिष्ठानः मार्च १९७२) म्हणून आनंद यादवाची गोतावळा ही कादंबरी सर्वार्थाने ग्रामीण असलेली अशी ही मराठीतील पहिलीच कादंबरी आहे असे म्हणता येईल. त्यातील नारबा एक निमित मात्र आहे. त्यातून ऐका शाश्वत आणि सखोल स्थित्यंतराची अभिव्यक्ति झालेली आहे.

३) [अस्सल प्रादेशिक कादंबरीच्या दृष्टीने विचार करता ' गोतावळा ' तील ग्रामीण जीवन जणू स्वतःच आपल्यासमोर मूर्तिमंत उभे रहाते आहे. कुठल्याही प्रकारचा आडपडदा त्याने आपल्यासमोर ठेवलेला नाही.] वाचकाची दृष्टी येथे एकदम प्रत्यक्ष ग्रामीण जीवनावरच रोखली जाते. लेखकाच्या दृष्टीकोणाच्या माध्यमाची येथे गरज भासत नाही. हे कशामुळे घडले ? एक तर [आनंद यादव अस्सल ग्रामीण जीवनातच जन्मले व वाढले हे होय. त्यांच्या अवती–भवती चहूअंगांनी ग्रामीण जीवन पसरलेले होते. त्यामुळे ग्रामीण जीवनाकडे **बाहेरून पहाण्याची त्यांना गरज भासली नाही**. त्यांच्या श्वासनिःश्वासातून ते प्रत्ययी प्रकट होत होते. त्यामुळेच ते अस्सल व अव्वलदर्जाची प्रादेशिक कादंबरी नारबाच्या भावजीवनाशी समरस होऊन चित्रित करू शकले.] ' राजस ' मासिकाला दिलेल्या मुलाखतीत स्वतः लेखकही तेच म्हणतात, ' मी ग्रामीण जग नुसतं बघितलं असं नाही. चार शेतकऱ्यांच्या मुलासारखाच मी एका खेड्यात वाढलो. घरचंच शेत असल्यामुळे त्यात

राबलो. जसजशी जाण आली... कळायला लागले म्हणण्यापेक्षा हा अनुभव वगैरे अजाणताच मनात घर करून रहात आला. आणि त्यातून नारबाच्या रूपाने त्या खेड्यातील आविष्कार झाला.' (राजस मासिक मार्च १९७२) एवढेच नव्हे तर प्रा. शांताबाई शेळके यांनी त्यांची ललितमध्ये जी मुलाखत घेतलेली आहे त्या ठिकाणीही त्यांनी म्हटलेले आहे. 'मी प्रत्यक्ष शेतीचा अनुभव घेतला आहे. विहिरीचा गाळ काढण्यापासून ते बांधबंदिस्ती करण्यापर्यंत, आणि पिकांना पाणी पाजण्यापासून तो मोटा मारण्यापर्यंत सगळ्या प्रकारचा अनुभव मी स्वत: घेतला आहे. किंबहुना मी असे म्हणेन की माझ्या साहित्यातील अनेक मध्यवर्ती पात्रे ही माझीच प्रतिबिंबे आहेत.' (ललित मासिक जून १९७३ पृ. १६)

याचाच दुसऱ्या शब्दात अर्थ असा की स्वत: भोगले, अनुभवले, पाहिले, त्याचे चिंतन-मनन झाले. ते खोल कुठेतरी रुजले आणि तरारून वर आले, त्यासाठी कोणत्याही दुसऱ्या हेतूची वा प्रेरणेची गरज भासली नाही. म्हणून अस्सल व अव्वल दर्जाची प्रादेशिक कादंबरी तयार झाली. या कादंबरीला हे जे यश मिळाले त्याचे कारण लेखकाच्या व्यक्तिमत्वात आणि त्याच्या जडणघडणीत आहे असे म्हणावे लागेल.

४) आणखी एका दृष्टीने ती खऱ्याखुऱ्या अर्थाने प्रादेशिक आहे असे वाटते. आतापर्यंत प्रादेशिक कादंबऱ्यातून जे ग्रामजीवन चित्रित झालेले आहे ते वेगळे आहे. र. वा. दिघ्यांनी जमीनदार व खाऊन-पिऊन सुखी असलेल्या शेतऱ्याची जीवनकथा रंगवली पेंडशांनी समाजातला थोडासा प्रतिष्ठित वर्गच कादंबरीत चित्रित केला. दांडेकरांनी 'पवनाकाठचा धोंडी' सारख्या कादंबऱ्यातून त्यालाच प्राधान्य दिले. परंतु आनंद यादवांनी प्रथमत: रोजाने गुरासारखें काम करणाऱ्या नारबाचे म्हणजे शेतमजुराचे चित्रण करून 'मातीखालच्या मातीला प्रथम हात घातला' एवढेच नव्हे तर शेतकऱ्याचा अविभाज्य घटक असलेल्या जनावरांचे सूक्ष्म चित्रण प्रथमत: त्यांनीच केले. त्यांचे बारकावे आणि जीवन आणि त्यांच्या मनातले भावतरंग प्रथमत: त्यांनीच प्रादेशिक कादंबरीत आणले. अर्धा माणूस आणि अर्धे ढोर असलेल्या नारबाच्या जीवनाशी प्राण्यांच्या जीवनाची संगती साधून त्यांच्या आंतरिक जीवनाचा, भावनांचा, वेदनांचा, त्याच्याकडे पाहिल्या जाणाऱ्या दृष्टीकोणाचा अतिशय ललितकोमल असा रसपूर्ण आणि नाविन्याने नटलेला आविष्कार त्यांनीच केला. पृ. ४१ वर मिळविलेल्या शिकारीवर खूष असलेल्या आणि त्यावर मेजवानी झोडणाऱ्या कुत्र्याचं लेखकानं केलेलं वर्णन पहा :

"लांडगा आल्यागत मान वर करून नाम्या खोपीकडं तरातरा आला...त्येला बघून कुतरी धावतच त्येच्याकडं गेली. पाठीमागं पिल्ली पळत गेली. चंपी शेपूट हाल्ठवत त्येच्यापुढं उताणी निजली. त्येनं हळूच तिला हुंगलं. तोंड जरा बाजूला करुन बेंबीच्या देठापासूनं पोट आत वडलं. घाळ्ळऽऽऽ दिशी दोन बचका मास तोंडातनं खाली पडलं. चंपी त्येच्या तोंडाफुडं गेली. बचाबचा गटकं करून खाऊ लागली. पिल्लांनी जरा जरा पळीवलं... चंपीनं मास खाल्लं. पुन्ना नाम्याचं तोंड चाटाय लागली. नाम्या तोंड चुकवत गप्पच. सुंदी

आल्यागत झालं हुतं." (पृ. ४१). अशी कितीतरी सूक्ष्म निरीक्षणांनी टिपलेली सुंदर चलतचित्र गोतावळामध्ये आपणास आढळतात. प्राणी सृष्टीतील हे वेगळे-अगळे चित्रणच या कादंबरीला अस्सलपणा देऊन जाते.

५) केवळ प्राण्यांचे बाह्यचित्रण लेखकाने केलेले नाही. तर त्यांच्या मनात निर्माण होणाऱ्या भावना व त्यानुसार घडणाऱ्या क्रिया यांचे नारबाद्वारे सुंदर चित्रण केलेले आहे. प्राण्यांचे मनोगत इतक्या तपशीलवार, सूक्ष्मतेने, स्वाभाविकपणे प्रथमच या कादंबरीत आढळते. बाह्यवर्णनाबरोबर अंतरंग वर्णनावरच लेखकाचा भर आहे. ते अंतरंगही कमलीच्या हळुवारपणाने आणि तितक्याच संवेदनक्षम मनाने साकार केलेले आहे. एका निकामी झालेल्या घोड्याचा मृत्यू चित्रित करताना नारबाच्या मुखातून लेखकाने या गोष्टीची सुंदर प्रचीती आणून दिलेली आहे. थोडक्यात प्रादेशिक कादंबरी म्हणून एका नव्या जीवनाचा, एका नव्या विश्वाचा-नव्हे डोळ्यामागील विश्वाचा, विश्वाच्या पोटाती विश्वाचा लेखकाने केलेला सौंदर्यात्मक आविष्कार अपूर्व असा आहे. म्हणून जिला खऱ्या अर्थाने प्रादेशिक कादंबरी म्हणता येईल अशी गोतावळा ही एकच कादंबरी होय.

६) प्रादेशिक कादंबरीचे यशस्वीपण तिच्यातून व्यक्त होणाऱ्या ग्रामसंस्कृतीच्या आविष्कारवरही खूपसे अवलंबून असते. त्यादृष्टीने 'गोतावळा' कादंबरी ग्रामीण जीवनाच्या रुढी-परंपरा कळत-नकळत चित्रित झालेल्या आहेत. म्हसोबाला नैवेद्य-नारळ फोडणे, बैलपोळ्याचा सण साजरा करणे, हातावर भाकरी घेऊन खाणे; भाकरी खात असताना उभ्या असलेल्या कुत्र्याला भाकरीचा तुकडा घालणे, कोंबडा कापल्यापर चार-मित्रांना मुद्दाम जेवायला बोलावणे; रानात फिरून गोवऱ्या गोळा करून सरपणाची व्यवस्था करणे? घुबडाचा अपशकून समजणे; त्याला त्यासाठी मारून टाकणे, वरातीला घोड्याचा वापर करणे; त्यावदली मालकाला एक फेटा व नारळ देणे; बैलाची ताकद टिकून राहण्यासाठी त्याला 'बडवणे.' मोराचे दर्शन शुभ मानणे; विकलेल्या गाईला 'निवद-नारोळ' वाहणं; या अशा ग्रामसंस्कृतीच्या अनेकविध खुणा गोतावळा कादंबरीत विखुरल्या आहेत. आणि वेगळे विश्व आपणासमोर साकार होते आहे या दृष्टीने विचार केला तरी गोतावळा ही एक श्रेष्ठ प्रादेशिक कादंबरी म्हटली पाहिजे.

७) भाषा व तिचा वापर कादंबरीला वेगळेपणा प्राप्त करून देत असतो. यादवांची गोतावळा मधील भाषा संपूर्णपणे ग्रामीण आहे. अध्ये-मध्ये नागरभाषेचा वापर करण्याची जी एक प्रथा आहे ती येथे स्वीकारलेली नाही. अस्सल ग्रामीण शब्द; नागर शब्दांचा भ्रष्ट उच्चार आणि खास खेडुताना शोभून दिसणारी तिची रचना यामुळे ही कमालीची यशस्वी झालेली आहे. भाषेच्या नावीन्यपूर्ण आविष्कारामुळे-अस्सल ग्रामीण बोलीचा संपूर्णपणे वापर केल्यामुळे प्रादेशिक कादंबरी म्हणून ती अस्सल व अव्वल वाटते. ढोरं, गायरं, ध्याण, हिर, भाकर-तुकडा झाडकांड, आडदाणी, बंबाळ, थलथलणे, शिंगटं-कचणी, कुंदाडपणा, जलम आरबाट, गुडवीमिठी, म्हवै, कांबरणे इ. अनेक शब्द कमा-

लीच्या स्वाभाविक रीतीने व मोठ्या खुबीने यादवांनी या कादंबरीत वापरल्याने वातावरण निर्मिती साधली जाते. व वातावरणामुळे तिचे प्रादेशिकत्व पटकन प्रत्ययाला येते. या दृष्टीने देखील 'गोतावळा' प्रादेशिक कादंबरी मानली पाहिजे. तरीही प्रा. प्रल्हाद वडेर यांना या ग्रामीण भाषेमुळे अनुभवाच्या आविष्काराला मर्यादा पडलेल्या आहेत असे वाटते (प्रतिष्ठानः मार्च १९७२). आणि श्री. प्र. श्री. नेरुरकर यांना तर या बिलोरी भाषेच्या प्रेमात पडल्याने जीवनाच्या तळापर्यंत लेखकाला जाताच आले नाही. शब्दांच्या मोहक जाळ्यात शाश्वत अनुभवाच्या मासोळ्या त्यांना पकडता आल्या नाहीत असा दोषही दाखवला आहे. (धरती मासिक मार्च १९७२).

तरीही [गोतावळा ही केवळ प्रादेशिक कादंबरी नसून तिच्या पलिकडे झेपावणारी मानवी जीवनातील चिरंतन प्रश्नांचा शोध घेणारी अशी ही कादंबरी आहे. ती प्रादेशिकतेच्या कसोट्या लवचिक करतेच. पण वेगळे असे प्रादेशिक जीवन चित्रित करून ती जीवनातल्या अपूर्व भावसत्याकडे झेपावते.] म्हणूनच प्रा. माधव मनोहर यांनी 'नवाकाळ' मध्ये परीक्षण करतात गोतावळा कादंबरीला महाकाव्याची उपमा दिलेली आहे. आणि ती योग्यच आहे. कोणाला हे विधान अतिरंजित वाटले तरी केवळ प्रादेशिक–ग्रामीण म्हणून ही तिची थोरवी किती व कशी आहे हे नामदेव ढसाळनी पुढे केलेल्या मूल्यमापनावरून सहज समजावे. ते लिहितात, " रचनेची कलात्मकता जपताना लेखकाने वास्तवतेची कोठेही विटंबना केलेली नाही. लेखकाच्या भाषेला एक धावता फ्लूट आहे. काव्यमयता आहे. नाद आहे. त्याला खऱ्या अर्थाने सम सापडली आहे. कारण त्याने प्रादेशिक पातळीवरचे सर्वंकष जीवन जसेच्या तसे घडविले आहे. त्यातल्या Facts बरोबर पकडल्या आहेत. तिथला समाज, व्यक्ती व काळ यांच्यामधला संघर्ष अवलोकन केलेला आहे. लेखक म्हणून अनुभव घेण्याचा–पिसाटपणा या लेखकाचे ठायी आहे. म्हणूनच खऱ्या अर्थाने प्रादेशिक दालनात एका श्रेष्ठ व सकस कादंबरीची भर पडू शकली. "(नंदा मासिक जानेवारी १९७२).

**प्रश्न ४–गोतावळा कादंबरीतील नारबाचे स्वभावचित्रण स्पष्ट करून त्याच्या भावविश्वाचा थोडक्यात परिचय करून द्या.**

**अथवा**

**'नारबाचे उध्वस्त भावविश्व साकार करण्यामध्येच या कादंबरीचे यश सामावले' आहे.' या विधानाचा परामर्ष घ्या.**

**अथवा**

**'मातीत रुतलेला अर्धा माणूस आणि अर्धा ढोर म्हणजे गोतावळ मधील नारबा. या विधानाची चर्चा करा.**

**उत्तर :–** गोतावळा कादंबरीतील प्रमुख व्यक्ती नारबा. तोच या कादंबरीचा कथनकार आहे. रामू सोनावडयाच्या मळयावर नोकर म्हणून जीवन जगत असताना त्याला जे जे एक वर्षभरात बदलत गेलेले जाणवले त्याचे तो loud thinking ज्या स्वरूपात आत्मकथन करतो आहे, त्याचे स्वतःचे जीवन आणि त्या जीवनाला लाभलेला जनावरांचा गोतावळा यांच्या अतूट स्नेहातून लेखकाने दोहोंचाही कलात्मक आविष्कार केलेला आहे. अशा या नारबाच्या स्वभावाची जाणवणारी स्वभाव वैशिष्टये प्रथम पाहू आणि मग त्याच्या उध्वस्त होत गेलेल्या मनातील वेदनाचा परिचय करून घेऊ.

नारबा हा शेतमजूर आहे. सालगडी आहे. मालकाच्या घरी ताटात पडणारे शिळेपाके अन्न चघळून पडेल ते काम करीत मळयावर तो मालकाने सांभाळलेल्या जनावरांची निगा राखत जगतो आहे. काढलेली धार देण्याच्या निमित्ताने कधी–मधी तो घरी येतो, पण मालक तेवढा वेळही त्याला घरात–गावात बसू देत नाही. त्याचं जग आहे मळा, मळयातली खोप, खोपी शेजारची शेती व शेतावर बांधलेली जनावरे यात ! शेतमळयातील पडतील ती कामे करीत तो दिवस–रात्रीच्या काटक्या मोडत जीवनाची शिळी भाकरी जनावरांकडून मिळणाऱ्या स्नेहात भिजवून तो घशाखाली घालतो आहे. याचे प्रमुख कारण तो आहे पोरका ! लहानपणीच आईवडिलांच्या प्रेमाचे छत्र नाहीसे झाल्याने व दुसरे कोणी नात्या–गोत्याचे नसल्याने तो प्रेमाचा, स्नेहाचा भुकेला आहे. मालक मालकिणीकडून तसे प्रेम व जिव्हाळा त्याला मिळालेला नाही. मालक त्याला एक बोलकं ढोर या पलीकडे किंमत देत नाही. आणि त्यामुळेच त्याचे जीवन म्हणजे आतून रिते रिते होत जाणाऱ्या अन् पोकळीनं गिळलेल्या एखाद्या जीर्ण खोडासमान बनलेले आहे. त्यामुळेच त्याच्याविषयी आपणास अपार करुणा वाटते.

नारबा तसा भावडा आहे. गरीब आहे. जुन्या जगातल्या चांगल्या गोष्टींवर त्याची अपार श्रद्धा आहे. त्या मूल्यांचा त्याला जीवन जगण्यासाठी खूप आधार वाटतो. अशिक्षित असला तरी मनाची उदात्तता, मनाची श्रीमंती कशानेही मोजता येणार नाही इतकी उदंड आहे. क्षेत्र हा त्याच्या जीवनाचा एकमेव स्थायीभाव आहे. तो मालकाच्या शेतावर प्रम करतो. मळयावर प्रेम करतो. माळावर आलेल्या उगवलेल्या झाडांवर प्रेम करतो. कुत्री, मांजरे, बैल, रेडा, म्हैस, घोडा, कोंबडी, पाडी, कासव, रेडकू, इ. साऱ्या प्राण्यांवर प्रेम करतो. ही सारी त्याच्या नात्यागोत्याची माणसे वाटतात. आपलीच रूपे वाटतात. त्यामुळेच नारबा तसा या जगात राहून ही वेगळया जगात वावरत असतो. त्याला व्यवहारवाद मंजूर नाही. स्वार्थ ठाऊक नाही. ज्याचे कष्ट आपण घेऊन जगत आलो. त्याची गरज संपल्यावर एखाद्या चिंधी सारखे फटकन फेकून देणे त्याच्या जिवावर येते. म्हणूनच एकेक जनावर कमी कमी होताना त्याच्या काळजाला घरे पडतात. जणू आपलाच ऐकेक अवयव गळून पडतो आहे असे त्याला प्रतीत. म्हणजेच नारबाच्या स्वभावाचे वैशिष्टच म्हणजे त्याला माणसापेक्षा ढोरं जवळची वाटवात. तो ढोरांत रमतो. ढोरांशी एकरूप होतो.

ढोरांची भाषा त्याला कळते. त्यांच्या भावनांची त्याला ओळख पटते. अन् परमेश्वराचे तेही एक रूप आहे. अशा श्रद्धेने स्वतःचे रक्त मोठ्या आनंदाने त्यांना अर्पण करतो.

नारबा जसा पोरका आहे तसाच अविवाहित आहे. वीस वर्षे तो मालकाच्या मळ्यावर काम करतो आहे. मालक त्याला दर लग्नसराईत आश्वासन देतो की, " या वर्षी लग्न करुन टाकतो. बायको अगदी सुंदरातली सुंदर बघतो तू काय काळजी करतोयस " पण ती वेळ काही येत नाही. मालकाच्या शब्दावर विश्वास ठेवून तो आपल्या संसाराची मधाळ चित्रे रेखाटतो आहेच झाले ! त्यामुळे तो कमालीचा खिन्न आहे. नाराज आहे. " आता आपलं कुठलं लगीन. कुठली बायकू. आपुन आता आसंच जाणार. ना पोरं. ना बाळं ! मालक फार तर रूईसंग लगीन लावून टाकील." अशी खंत तो आपल्या मनाशीच बोलून दाखवतो. माणसाला स्वाभाविक असणाऱ्या ज्या क्षुधा असतात त्यात ' सेक्स ' ची क्षुधा जबरदस्त असते. आणि ती त्याची क्षुधा शेवटपर्यंत तशीच अतृप्त राहिलेली आहे. त्यामुळे माजाला आलेली पाडी राहून त्याला कणवही येते अन् आपली भूक' जाणवते. " घटकाभर बैल असतू तर एक वेगळं " असेही तो बोलून जातो. त्याच्या साऱ्या गोतावळ्यात अशी मीलनातून आलेली तृप्ती प्रत्ययाला येते. नाम्याला चंपी असते. कोंबड्याला कोंबडी आणायला तो सांगतो. म्हशीसाठी रेडं असतात. कावळ्यांना माद्या आहेत. इतर प्राण्यांना ' ती सुखे ' आहेत. पण आपणाला मात्र बायकू नाही. ' परतेकाला बायकू ही पायजेलच " असे उद्गार त्यामुळेच त्याच्या मुखातून बाहेर पडतात आणि ते स्वाभाविक आहे.

पण त्याची ही शारीरिक भूक त्याने अनैतिक रूपाने भागविली नाही. त्याला एकादी बाई ठेवता आली असती. खेड्यातल्या जीवनात तसे केले असते तर वावगे झाले नसते. पण तो आपल्या साऱ्या शरीर भावनांचे उदात्तीकरण करतो. त्या ' ग्लोरिफाय ' करतो. त्याच्या पोटात न मावणारे हे प्रेम तो शेवटी प्राण्यांवर करतो. आपली आसक्ती तो सहानुभूतीत रूपांतरित करतो. बायकोची असलेली उणीव तो पिल्लावर, पाडीवर, घोड्यांवर प्रेम करून भरुन काढतो. कारण लग्न ही पवित्र बाब आहे. अशी त्याची कल्पना आहे. लग्नाशिवाय माणसाला सद्‌गती नाही. माणसाच्या आयुष्याला पूर्णत्व येत नाही असा त्याचा समज आहे. तरीही तो अनैतिक संबंध ठेवत नाही. त्याबाबत स्वतः लेखक म्हणतात, " ऐक तर नारबा बनेल, छाकटा असा नाही, दुसरे म्हणजे सदा तो शेतात राबतो. गावात असे येतच नाही. पुन्हा स्वभाव भिडस्त. पापभिरू. आपलं पोट भरायचं एवढंच त्याला ठाऊक " (राजस मासिकः मार्च १९७२) म्हणून त्याच्या या लैंगिक भावना लेखकाने संक्रान्त केलेल्या आहेत. अन् प्राण्यांच्या मीलनातून त्याबद्दल वाटणारी आवडही दाखवून दिलेली आहे.

त्याच्या स्वभावाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे तो कमालीचा काव्यात्म मनोवृत्तीचा, संवेदनाशील मनाचा, हळुवार अंतःकरणाचा, सूक्ष्म निरीक्षण शक्ती असलेला

करुणेने उमलून येणारा आणि निष्ठापूर्वक जीवन जगणारा असा आहे. त्यामुळेच बदलत्या निसर्गाची बदलती रंग–रूपे तो सहजपणे टिपून घेतो. निसर्गाची स्पंदने त्याला प्रखरपणे, जाणवतात. त्यामुळेच त्याला " आभाळाचे पिल्लू बनून त्याच्या कुशीत शिरावं वाटतं. अंतराळी व्हावंसं वाटतं. समदं न्याहाळावं, कुरळावं, उरासंग धरून मिठी मारावी " असे वाटते. निसर्गसौंदर्याशी तो लीलया तदात्म्य पावतो. म्हणजेच व्यक्तित्वात अध्यात्माचे रंग मिसळलेले आहेत. त्यामुळेच आईच्या मायेने उदंड सहानुभूतीमुळे साऱ्या जनावरांचे हवे नको पाहतो. त्याचे दुःख ते याचे दुःख बनते. असे दोहोत अतरीचे नाते दृढ बनलेले असते. तो व प्राणी अज्ञात अशा नियतीच्या क्रूर शक्तीचे आंधळे बळी बनतात.

थोडक्यात, 'गोतावळा' मधील नारबा गुरांना सारसर्वस्व मानणारा, अपार माया असलेला, पोरकेपणाने दुभंगूनही त्याला जोडणारा, मातीशी नाते जोडणारा, कमालीचा हळवा, सौंदर्यदृष्टी असणारा, आपल्या वेदनावर झाकण घालून प्राण्यांच्या वेदना आपल्या मानणारा, गुराढोरांचा संसार करणारा पारंपरिक श्रद्धा व मूल्यांना जपणारा, कष्टाळू, प्रामाणिक, अपार करुणा असणारा आणि जगण्यातला आनंद संपल्यामुळे मुळचा उपटून फेकलेल्या रोपट्याप्रमाणे तळमळणारा आणि सामाजिक दृष्ट्या एखाद्या लक्तराप्रमाणे जीवन जगणारा असा हा पोरका अन् 'उपाशी' शेतगडी आहे !

आता त्याच्या उध्वस्त जीवनाविषयी विचार करावयाचा !

नारबाचे उध्वस्त जीवन कमालीच्या ताकदीने यादवांनी उभे केले यातच या कादंबरीचे यश सामावलेले आहे. त्याने आपल्या स्वप्नभूमीत प्राण्यांची जी नाती जपली होती, त्याचे आणि ढोरांचे जे एक अलौकिक नाते नकळत दृढ झालेले असते, त्यामुळेच बेचव व बाईविना अधिक निरस असलेले जीवन तो जगतो. नारबा हा खरे तर मालकासाठी जगत नाही. स्वतःसाठी जगत नाही. उद्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी जगत नाही. आपणास आजउद्या बायकोचे सुख मिळेल म्हणून जगत नाही अथवा मरत नाही. म्हणूनही तो जगत नाही. त्याचे जगणे असे दिशाहिन व हेतूशून्य नाही. नारबा जगतो, तो प्राण्यांवरील प्रेमासाठी, प्राण्यांच्या प्रेमावर, मातीच्या उबेमुळे ! तोच त्याचा गोतावळा असतो. तीच त्याची नात्या–गोत्याची, जीवाभावाची, माणसे असतात. तेच त्याचे कुटुंब असते. तो त्याचा हितकर्ता, विघ्नहर्ता, करता–सवरता असतो. आणि त्यामुळे त्याला वेदनेच्या अंगारावरून चटके बसणाऱ्या पायांनी मृत्यूचे शाप सोसत–पचवत असहाय्य होऊन जगावे लागते आहे. माजलेला कोंबडा आणि जननक्षमता नष्ट झालेला बैल यांच्याप्रती वाटणाऱ्या असीम सहानुभूतीने नारबाच्या मनाचा लहानमोठा कोपरा व्यापलेला आहे. आणि त्यामुळेच त्याच्या जीवनात दुःखाने प्रवेश केला आहे.

नारबाचे विश्व जे उध्वस्त झालेले आहे, त्याची तीन कारणे आपणास सापडतात. किंबहुना चार कारणे आपणास सांगता येतील. त्यातले पहिले कारण म्हणजे

(१) **नारबाचे व्यक्तिमत्व.** त्याचे व्यक्तिमत्व चार चौघांसारखे नाही. प्राप्त परिस्थितीशी त्याला जुळवून घेता येत नाही. जुन्या श्रद्धा जोपासण्याची त्याच्या रक्ताला संवय जडलेली आणि मनाने अत्यंत कनवाळू असल्याने वास्तविक जे जे म्हणून नष्ट होत जाते आहे; त्याबद्दल त्याला त्यामुळेच खंत वाटते आहे. तो मनाने पक्का, वागण्याला व्यवहारी वृत्तीने बेडर व बोलण्या चालण्यात बनेल असा असता तर त्याला जे दुःख जाणवते ते जाणवत नाही. अपार करुणा व उदंड माया यांनी त्याची मूस घडविल्याने त्याला शेतमळयातील चैतन्याच्या खुणा एकेक करता नष्ट होताना पाहून कमालीचा विषाद वाटतो. त्यामुळे त्याचे जीवन हे भकास आणि दुःखमय झालेले आहे.

(२) दुसरे कारण म्हणजे त्याचे निष्प्रेम जीवन त्याला उभ्या आयुष्यात प्रेम असे मिळाले नाही. आई, बाप, भाऊ, वहीण वा मालक–मालकीण यापैकी कोणीच त्याच्यावर वर्षाव केलेला नाही. त्यामुळे तो 'कोरडा' बनलेला आहे. या प्रेमविहिन जीवनामुळे त्याला आपल्या आयुष्याचा पाला–पाचोळा होतो आहे याची पदोपदी खंत जाणवते आहे. त्यात पुन्हा त्याचे लग्न झालेले नाही. सित्यासारखा गडी मात्र रात्री घरी जाऊन कौटुंबिक व भावनिक सुखे दो दो हातांनी लुटतो; पण आपण तसे तरावट अन् पौरुषत्वाने मुसमुसलेले असूनही व तशी इच्छा असूनही जमत नाही याचा विषाद त्याच्या भावड्या मनात दाटून राहतो. बरे, स्वतःहून लग्न करण्याचा त्याने निश्चय केलेला असता तर गोष्ट वेगळी ! पण वयात आल्यापासून त्याला बायको हवीशी वाटत असूनही मालक त्याला केवळ झुलवीत असतो. आपल्या कडेखांद्यावर खेळलेल्या मालकाच्या पोरीचे लग्न होते. तिला हवे ते मिळते; पण आपणास मात्र नाही. मालकाचा हिशोब असा की बायको करून दिली की, ह्याचे संसारात मन रमणार. पोराकडे लक्ष गुंतणार, व शेतीकडे लक्ष उरणार नाही. म्हणून तो मुद्दाम दरवर्षी पुढल्या लग्नसराईचा वायदा नारबाला सांगतो. आणि भूक असून तो 'उपाशी' राहिल्याने त्याचे विश्व कणाकणाने उध्वस्त होत गेलेले आहे. त्याला या शारीरिक सुखाची अपरिहार्य गरज वाटते. त्यामुळेच त्याला जनावरांची सुखी जोडपी पाहून भळभळून येते. त्याचे मन उदास बनते. उध्वस्त होते. त्याच्या दुःखाला हे एक कारण घडलेले आहे.

(३) तिसरे आणि महत्त्वाचे कारण म्हणजे त्याने जो जिवाभावाने गोतावळा सांभाळला होता. त्याची डोळ्यादेखत कुतर ओढ झालेली पाहावी लागते. मालकाला ट्रॅक्टर आणायचा असतो. आणि त्यासाठी त्याला निरुपयोगी जनावरे विकून वा फुंकून टाकायची असतात. नारबाच्या समोर अधू असलेले घोडे मरते. त्याची माती बनते. पण मालकाला त्याचे काहीच वाटत नाही; पण नारबाला मात्र भडभडून येते. त्याला ते मरण पचवता येत नाही. कोंबडा कापून खाल्ला जातो. म्हैस विकली जाते. गाय विकली जाते. पिल्ले मुंगसाकडून पळविली जातात. रेडे निकामी होतात. ज्या बैलाने उभे आयुष्य मालकासाठी कणाकणाने झिजविलेले असते तो मरत नसताना

पाच–पन्नास रुपयांसाठी जिवंतपणी मारण्यासाठी मांगाना विकला जातो. मांस आणि ढालीसाठी पाठ हवी म्हणून कासवाचा बळी घेतला जातो. चंपी व नाम्या ही दोन कुत्री मृत्यूच्या मिठीत सहज सापडली जातात. घुबडाची अकारण हत्या केली जाते. हे सारे सारे त्याच्या जगण्याला आतून शक्ती देत होते. त्याला जगवत होते. तो त्याचा गोतावळा होता. हा सारा गोतावळा शुद्ध व्यवहार आणि कृतघ्नपणापोटी कापला जातो. नजरेआड होतो. त्या गोतावळयाबद्दल बाजू घेऊन भांडले तरी त्याला अगतिक होऊन गप्प बसावे लागते. आणि त्यामुळेच त्याच्या हृदयाची कालवाकालव होते. त्याला आपल्या जिवापेक्षा प्रिय असलेल्या जनावरांची मरणे. पचवता येत नाहीत. त्यामुळे त्याला शेवटी जुलाब होत असावेत) आणि त्यामुळेच त्याच्या हळुवार हृदयाचे बंध एकेका धाग्याने सैल होऊन निकामी झाल्यासारखे वाटतात. आपणच स्वतः त्यांच्या रूपाने हळू हळू संपत चाललो आहे असे वाटते हे उध्वस्त जीवनाचे अत्यंत महत्त्वाचे कारण आहे.

(४) आणि तो कमालीचा निसर्ग प्रिय आहे. सौंदर्याचे अंग उपजतच त्याला लाभलेले आहे. आकाशाचे बदलते रंग आणि वनसृष्टीचा मोहक आविष्कार नजरेने टिपून घेत तो जगत असतो. माळावरची झाडे त्याला हात उंचावून बोलावतात असे वाटते. शेतमळयातील पिकांचे बदलते जीवन त्याच्या जीवनात एकरूप झालेले असते. निसर्गाची स्पंदने त्याला 'नित्य नवा दिस जागृतीचा' प्राप्त करून देत असल्याने माळावरील सारी झाडे जेव्हा तोडली जातात. तेव्हा त्याला कमालीचा विषाद वाटतो. दुःख होते. त्यांचे डवरून आलेले जीवन स्वार्थी मानव हातांनी नष्ट करतो हे त्याच्या जीवनात बसणारे नसते. म्हणून तो हळू हळू उध्वस्त होतो. त्याच्या जीवनात पोकळी निर्माण होते. अर्धे ढोर आणि अर्धा माणूस असे त्याचे स्वरूप बनते. या मुळेच !

हे उध्वस्त जीवन लेखकाने संगतवार असे शब्दांकित केलेले आहेच. पण त्यातच वैयक्तिक दुःखही मिसळलेले आहे. मानवी व अमानवी अशा ध्वंसाबद्दल त्याला जगणे मुष्किल होते अन् त्यामुळेच तो मनाने मरत गेलेला आहे. म्हणून आकाशवाणीवर [गोतावळाचे परीक्षण करताना डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, "जनावर होऊन राहिलेल्या या सामान्य माणसाचं दुःख आपल्याला अस्वस्थ करत भारावून टाकतं. आणि ही क्षुधा आपल्या अंतःकरणात घुमत राहते.] नारबाच्या जीवनातील आंदोलने गोचर करण्याची ताकद यादवांच्या भाषेत आहे. चहुबाजूंनी कोसळलेल्या आभाळामुळे नारबाच्या सोन्यासारख्या जीवनाची माती व्हावी, आणि मातीतून सोनं काढावं म्हणून रामू सोनावडा झपाटून जावा हा केवढा दैवदुर्विलास ! जगण्यातला अर्थ गवसला नाही तरी हा माणूस जगतच राहतो या महान सत्याची जाणीव गोतावळा वाचताना सतत होत राहते यापेक्षा कादंबरीचं दुसरं यश तरी कोणतं ?" (आकाशवाणी पुणे–ता. १४–११–७१.)

**प्रश्न ५–'गोतावळा' कादंबरीतील लेखकाला अभिप्रेत असलेला विचार कोणता!' तो विचार कितपत व्यक्त झाला आहे ?**

किंवा

' गोतावळा ही एका युगांतरची कथा आहे ' या प्रा. रा. भि. जोशी यांच्या विधानाचा उहापोह करा.

किंवा

' गोतावळा ' कादंबरीमध्ये बदलत्या जीवनाची रूखरूख चित्रित केलेली आहे' या विधानाचा परामर्श घ्या.

किंवा

गोतावळा कादंबरीचा प्रतिपादित विषय कोणता ते सोदाहरण स्पष्ट करा.

उत्तर–श्रेष्ठ स्वरूपाची कादंबरी ही एकाच वेळी जीवनानुभूतींच्या वेगवेगळया पातळयांना स्पर्श करीत असते. जीवनातील संमिश्र अशा अनाकलनीय भावतत्त्यावर भेदक प्रकाश टाकून वाचकांच्या जीवनजाणिवा रुंदावत असते. किंबहुना अनेक अर्थाची वलये ज्या कादंबरीतून वाचकांच्या मनोगाभाऱ्यात निर्माण होतात; ती शाश्वत किंवा श्रेष्ठ अशी कादंबरी म्हटले पाहिजे. या दृष्टीने ' गोतावळा ' कादंबरीचे यश उदंड असे आहे. ती कादंबरी अनेक समीक्षकांना अनेक अर्थ प्रकटीकरणाच्या सामर्थ्यामुळे आवडली आहे. त्यामुळे या कादंबरीचा प्रतिपादित विषय हा जीवनाच्या अनेक अज्ञात अंगांना स्पर्श करून जातो. त्यामुळेच एकाच कादंबरीतून अनेकांना अनेक अर्थ प्रतीत झालेले आहेत. काढलेले आहेत.

१) स्वत: लेखकाला प्राणीसृष्टीचे सूक्ष्म असे बदलते जीवन आणि त्याच्या मनात उद्भवणारे विविध भावना–वासना चित्रित करायच्या आहेत आणि तशी कबुली त्याने राजस मासिकातर्फे श्री. आवटी यांनी जी मुलाखत घेतली त्यात सांगून टाकलेले आहे. आणि लेखकाच्या मनातला हा हेतूच कादंबरीचा गाभा मानायला हरकत नाही. कारण या कादंबरीत म्हैस, बैल, गाय, शेळी, कोंबडी, मोर, कावळे, कुत्री, घोडा, टोळपक्षी, किडे मुंग्या, मुंगूस यांच्या जीवनाची रेखाटने काढलेली आहेत. त्यांच्या जीवनाची स्थितीगती चित्रित केलेली आहे. त्याचे बदलते जीवन चित्रित केलेले आहे. त्यांच्या खोडी आणि स्वभावधर्म शब्दांकित केलेले आहेत. त्यांच्या मनातल्या भावना जाणून व्यक्त केलेल्या आहेत. उन्हानं घायाळ होणारे रेडे, बडवलेला व त्यामुळे मंद बनलेला बैल, ओपला आलेली पाडी, त्याला बघून चेतावून गेलेले बैल, माजलेला कोंबडा, त्याची दांडगाई, मुंगसामुळे एकेक कमी होणारे कोंबडीचे पिलू, नाम्याने केलेली शिकार, वाटेकरी झालेली चंपी, ते मास खाण्याची त्यांची पद्धती, या साऱ्यांचे बाह्यवर्णन हालचालींचे वर्णन लेखकाने जीव ओतून केलेले आहे. त्या साऱ्यांचा ठसाच आपल्या मनावर अधिक प्रमाणात आणि खोलवर उमटलेला आपणास दिसतो. म्हणून या कादंबरीच्या प्रतिपादित विषय प्राणीसृष्टीचे अज्ञात आणि अपूर्व असे जीवन चित्रित करणे हाच आहे असे लेखकाच्या विवेचनाचा निर्वाळा देऊन म्हणता येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२०८
२२०९७



(२) तरीही लेखकाने प्राणीजीवनाचा केलेला आविष्कार शुद्ध आणि स्वतंत्र असा नाही. एका अंगाने तो हळूहळू आपल्यासमोर उलगडत असतो; तर ज्या ज्या अंगाने त्यात नारबाचे जीवन गुंतल्याने त्याचाही आविष्कार होत असतो. प्राण्यांचे मावजीवन आणि नारबाचे भावजीवन ही एकमेकात एकरूप झालेली आणि एकाच रोपाला दोन फांद्या फुटून त्यांना जसा एकाच बुंध्यातून जीवनरस मिळतो; तसे नारबाचे आणि प्राण्यांचे भावजीवन एका जीवनमुशीत एकजीव झालेले असल्याने या कादंबरीतून केवळ प्राण्यांचे जीवन चित्रित झालेले नाही. तर नारबाचेही भावविश्वही चित्रित झालेले आहे. प्राण्यांप्रमाणे नारबाच्या जीवनातील विविध आंदोलने प्रत्येक प्रकरणातून आपणास जाणवतात. त्याचे पोरकेपण, त्याचा त्याला वाटणारा विषाद, त्याला नसलेला संसार; त्यापोटी त्याची होणारी उपासमार, " निदान भाकरीपुरती तरी प्रत्येकाला बायको ही पायजेच " ही त्याची मागणी; मालकाकडून त्याला मिळणारी वागणूक, त्याच्या जिवाभावांची एकरुप झालेली जनावरे मालकाने निर्दयपणे विकून टाकल्याने त्याची होणारी कालवाकालव, निरुपयोगी जनावरांबद्दल त्याला वाटणारी सहानुभूती व मालकाची व्यवहारी वृत्ती 'माती असशी—मातीला मिळशी' या विचाराचा त्याच्या मनावर झालेला परिणाम, ट्रॅक्टरच्या आगमनाने त्याची होणारी परवड, माजलेला कोंबडा खाताना त्याला जाणवणारी खंत इ. साऱ्या भावना या कादंबरीतून नारबाच्या ढासळणाऱ्या जीवनाचे स्वच्छ प्रकटीकरण यात प्रतिबिंबीत झालेले असल्याने या कादंबरीचे प्रतिपादित प्रामुख्याने नारबाचे झालेले उध्वस्त विश्व हेच आहे असेही आपणास उत्कटत्वाने जाणवते. म्हणून जवळ जवळ साऱ्या समीक्षकांनी 'गोतावळा' कादंबरीचा हाच प्रतिपादित विषय आहे असे दाखवून दिलेले आहे.

(३) त्याचबरोबर बदलत्या जीवनाची रुखरुख नारबाच्या रूपाने लेखकाने चित्रित केलेली आहे असे 'नवाकाळ' (९ जानेवारी १९७२) च्या समीक्षकाने म्हटले आहे. आज जी शेती आहे, व तिच्याकडे पहाण्याचा व कसण्याचा जो पारंपरिक दृष्टीकोन आहे, तो बदलल्याने 'अधिक चांगल्यासाठी' त्यापेक्षा 'अधिक चांगले असलेले' आपण गमावून तर बसलो नाही ना ? असा प्रश्न कादंबरी वाचल्यावर आपल्या मनासमोर उभा रहातो. यंत्रयुगाचा आपण पुरस्कार करतो हे भौतिक सुखाच्या वृद्धीसाठी योग्य असले तरी ते आपल्या संस्कृतीची व जीवनाची तोडमोड करून येऊ नये. ते सहजपणे जीवनाशी एकरूप झाले तर ठीक. पण भौतिक सुख देण्यासाठी आलेले यंत्रयुग मानवाचे आत्मिक सुख हरवून टाकत असेल तर ते कुचकामी म्हटले पाहिजे, असा विचार गोतावळा कादंबरी सूचित करते आहे. प्राण्याची हत्या करून आणि निसर्गसौंदर्याचा नायनाट करून अशी शरीरसुखे मिळाली तर ती मानवाला शाश्वत सुख देत नाहीत. असे लेखकाला सूचित करावयाचे असावे. आणि समाज प्रबोधन पत्रिकेत 'गोतावळा' चे परीक्षण करणाऱ्या मीनाक्षी रायकर यांनीही हाच प्रतिपादित विषय असावा असे मानले आहे.

(४) तर बदलत्या युगाच्या वेदना शब्दांकित करणे हा या कादंबरीचा मुख्य गाभा आहे असे प्रा. रा. भि. जोशी (ललित : एप्रिल १९७२) यांनी कथन केलेले आहे. त्यांच्या मते, "हे एका युगांतराचे चित्रण आहे. शेतीसंबंधाच्या दृष्टीकोणात पडत असलेल्या आणि त्यामुळेच माणसां–माणसांत आणि माणसां–गुरांत संबंध पडणाऱ्या फरकाचे हे चित्रण आहे. त्यावर भाष्य नाही. त्यात भावविवशतेला वाव नाही. बिचाऱ्या नारबाच्या भावनाचा चेंदामेदा होतो; पण तेही पुढे रोमँटिक करण्याचा प्रयत्न नाही." या कादंबरीवर येणाऱ्या आरोपांचा प्रथम विचार करून प्रा. रा. भि. जोशी म्हणतात, "कदाचित पुरो गामी वाचक म्हणतील की शेतीत जी क्रांती होऊ घातली आहे; तिचे लेखकाने स्वागत केलेले नाही. उलट तिच्याविरुद्धच त्यांचा रोख दिसतो. पण लेखकाने पुरोगामी वा प्रति-गामी होण्याचा प्रयत्न केलेला नाही......" म्हणून एका बदलत्या व मावळत्या युगाच्या वेदना शब्दांकित करण्याचा लेखकाचा हेतू असावा. भारतीय संस्कृतीची परंपरेने चालत आलेली जी शाश्वत मूल्ये आहेत; ती उध्वस्त होत आहेत. माणूस अधिक संपत्तीलोभी बनत चाललेला आहे. तो आपले सारे सुख पैशात मोजतो." आपल्या स्वतःच्या मृताचा देखील पैसा केला पाहिजे.' ही त्याची नवी कृती आहे आणि ते नव्या युगाचे सूचन करते. नव्या मूल्यांची व युगाची नांदी कथन करते. म्हणून नव्या जुन्या युगाच्या छेदबिंदू-वर झडलेल्या ठिणग्याने भळभळणाऱ्या जखमेची आर्त कहाणी म्हणजे आनंद यादवांची गोतावळा म्हटली पाहिजे.

( ५ ) पण हा हेतूही कादंबरीवर अन्याय करणारा आहे. एकादी कादंबरी ही 'ख' पुष्पासारखी असते. तिचे विभ्रम आणि सौंदर्य जसजसे वेगवेगळ्या कोनांनी आपण न्याहाळू तसतसे वेगवेगळ्या स्वरूपात प्रतीत होत असते. चांगली कादंबरी ही कॅलिडिस्कोप किंवा एखाद्या शोभादर्शक यंत्रासारखी असते. हातातले शोभादर्शक यंत्र जसजसे बदलावे तसतसे त्यातून दिसणारी दृश्ये बदललेली असतात. आणि प्रत्येक दृश्य ' देखणे ' असतें. 'गोतावळा कादंबरीच्या संदर्भात नेमके हेच घडते आहे. गोतावळा ही एक चिरंतन दुःखाचा वेध घेणारी कादंबरी आहे. मानवी जीवनाच्या तळाशी ठसठसणाऱ्या ज्या अनामिक वेदना व शल्ये असतात त्यांचीच ही कादंबरी आविष्कार करते. आणि नेमके याच गोष्टीवर श्रीराम कृष्ण बोरकर यांनी बोट ठेवलेले आहे ते लिहितात, " प्रस्तुत कादंबरी रूढार्थाने प्रादेशिक असली तरी तिचा वर्ण्य विषय शेतकरी जीवनातल्या **एका व्यापक आणि चिरंतन** दुःखाचा धगधगता प्रत्यय देतो. म्हणूनच तिला एक चिरस्थायी व सर्वस्पर्शी बैठक लाभते. मराठीतील ही एक नितांत सुंदर व चिरस्मरणीय कादंबरी आहे असे म्हटल्यावाचून राह-वत नाही." (महाराष्ट्र टाइम्स दि. १।११।१९७१) सामान्य माणसाचे जीवन उध्वस्त झाल्यावर त्याच्यासमोर प्रश्न उभा राहतो की माणसाच्या जगण्याला अर्थ आहे का? माणूस, निसर्ग व आत्मा यांचा परस्परांशी काही संबंध आहे का ? हे प्रश्न नेहमीच अनु-त्तरीत राहतात. पण जगण्यातला अर्थ शोधण्याचा कलावंताचा प्रयत्न कधीच संपत नाही.

आनंद यादवांनी हाच प्रयत्न, हेच चिरंतर प्रश्न व त्यातून ठसठसणारे दुःख शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणूनच तिची महत्ता नि गुणवत्ता वाढलेली आहे. गोतावळा कादंबरीची मीमांसा करताना नेमक्या याच महत्तेबर श्री. प्रभाकर पाध्ये यांनी बोट ठेवलेले आहे. मानवी मनाला चिरंतन पडणारे प्रश्न म्हणजे जन्म, मृत्यू, प्रेम, बंधुत्व, त्याचे भवितव्य आत्मज्ञान अगर आत्मज्ञानाची आस अगर त्याला जिंकण्याची आस, सहवासाची आस अगर निसर्गाशी संबंध जोडण्याची आस. हे चिरंतन मूलभूत संबंध मानव–निसर्ग व आत्मा यांच्यामधून निर्माण झालेले असतात. आणि त्याचा केंद्रबिंदू असतो मानव. तो आला कोठून, जाणार कोठे, त्याचे व निसर्गाचे संबंध काय ? त्याचं भवितव्य काय ? तो जगतो कशासाठी या साऱ्या प्रश्नांचा शोध कलावंत आपल्या कलावृतीतून करीत असतो. " असा शोध यादवांनी केला आहे काय ? असा प्रश्न पाध्ये उपस्थित करुन " मानवानं मानवाचं काय केले हे ? हा सनातन प्रश्न यादवांनी चित्रित केलेला आहे. प्रेम व भोगासक्ती यांचा शाश्वत गाभा लेखकाने पकडला आहे. लेखकाने हे सारे कधी आघातपूर्वक, तर कधी अजाणता स्पर्श करुन चिरंतन मानवी प्रश्नांचा शोध घेतलेला आहे." (केसरी तारीख ५ सप्टेंबर १९७१).

७) याखेरीज आणखी एक प्रतिपादित हेतू या कादंबरीतून व्यक्त होतो. असा नामदेव ढसाळ यांनी दावा केलेला आहे. त्यांच्यामते शोषित व शोषक यांचा जिवघेणा संघर्ष चित्रित केलेला आहे. 'आहे रे' आणि 'नाही रे' हा सनातन झगडा यातून दाखवून कामगार, दलित अशा वर्गाची सर्वच क्षेत्रात कुत्तरओढ होत आहे. मार्क्सने जे कथन केलेले आहे ते येथेही–खेड्यातूनही प्रत्ययाला येते. म्हणून विविध अंगांचा अविष्कार करीत असतानाच मालक विरुद्ध नोकर, धनको विरुद्ध गरीब, सत्ता विरुद्ध सेवा असा झगडा रामू सोनवडा आणि नारबाच्या रूपाने लेखकाने वाचकांच्या समोर ठेवलेला आहे असे त्यांचे मत.

मला वाटते, अशा विविध अर्थवलयांची समृद्धता हीच गोतावळ्याच्या श्रेष्ठत्वाची खूण आहे. आतापर्यंत व्यक्त झालेली मते या कादंबरीत जाणवताताच, पण उद्या आणखी एखादा समीक्षक नव्या शास्त्राचा आधार घेऊन एखादे नवे व सर्वलागू तत्त्वज्ञान काढून दाखवील असेही वाटते. कुणी सांगावे ?

**प्रश्न ६–' गोतावळा ' कादंबरीतील संघर्ष कोणत्या स्वरूपाचा आहे याचे थोडक्यात स्वरूप स्पष्ट करा.**

**उत्तर–१)** ' गोतावळा ' कादंबरीत नेहमीच्या कादंबऱ्यात असतो तसा भडक आणि बटबटीत संघर्ष नाही. एका बाजूला सत्याचा पाठपुरावा करणारा पक्ष आणि दुसऱ्या बाजूला असत्यासाठी–स्वार्थासाठी क्रूरकर्मे करणारी पात्रे यांचा झगडा या कादंबरीत नाही. अथवा अन्यायाला झुंजारपणे तोंड देणारा धीरोदात्त अन् त्यातून जन्माला येणारा संघर्ष या कादंबरीत नाही. किंवा भडक मारामारीद्वारे साधलेला संघर्षही या कादंबरीत

नाही. या कादंबरीत असलेला संघर्ष व त्याची जात सर्वस्वी वेगळी आहे. सूक्ष्म आहे. आणि तितकाच मनोज्ञ आहे. अबोध रीतीने अंतःकरणाच्या अंतःकरणात सलणाऱ्या सूक्ष्म दुःखाशी निगडित असलेला हा संघर्ष आहे. तो अतिशय मनोनिष्ठ आहे. अन् तितकाच बहुपेडी आहे.

२) यातला सामान्य वाचकांना जाणवणारा संघर्ष म्हणजे यंत्र विरुद्ध मानव असा आहे. यंत्राच्या आगमनामुळे मानवीजीवन आणि त्याच्याशी निगडित असलेले प्राणीजीवन उघडे पडते. निकामी होते. जीवनापासून बाहेर फेकले जाते अन् मरणाच्या वाटेला लागते असे स्वरूप संघर्षाने धारण केलेले आहे. म्हणून आजच्या जगातला शाश्वत आणि सर्वस्पर्शी संघर्ष या कादंबरीतून सूचित केलेला आहे. ट्रॅक्टर येताच नारबाशिवाय ज्याचे पान हलत नाही असा मालक 'नारबाला तुझी तू कुठंही चालता हो' अशी भाषा वापरतो. या पाठीमागे यंत्राने दिलेली ताकद आहे. मदत आहे. ट्रॅक्टर आलाच नसता तर नारबासारखा शेतमजूर जीवनातून बाहेर फेकलाच नसता. म्हणून मानवाला निकामी करणाऱ्या यंत्राचा व मानवाचा एक संघर्ष या कादंबरीत आपणास लगेच जाणवतो.

३) एवढेच नव्हे तर या कादंबरीत आणखा एक मूल्यावर अधिष्ठित असा संघर्ष आहे. शाश्वत मूल्यांना पुन्हा पुन्हा हादरे देणारे समाजजीवनातले काही तात्कालिक स्वार्थ उफाळत्या पाण्याप्रमाणे त्या मूल्यांना गिळण्यास सदैव धजावत असतात. आणि त्यातून एक सूक्ष्म संघर्ष आकाराला येतो. वात्सल्य, माया, प्रेम, बंधुत्व आणि व्यवहार, स्वार्थ व मुत्सदीपणा (धूर्तपणा) यांचा होणारा सूक्ष्म झगडा या कादंबरीत चित्रित झालेला आहे. एकीकडे नारबाचे जनावरांवरील प्रेम तर त्याला छेद देणारी मालकाची निष्ठुरता, एकीकडे तोंडात घास घालण्यापूर्वी जनावरांच्या मुखात चारा घालणाऱ्या नारबाचे प्रेम, तर त्यांना निर्दयपणे नाहक खर्च वाढतो म्हणून विकून टाकणारा व्यवहारी मालक, नारबाची माया एकीकडे तर मालकाचा मोह दुसरीकडे. नारबाचे प्रेम एकीकडे तर मालकाची पैशावरील दृष्टी एकीकडे. असा हा संघर्ष आपणास या कादंबरीत सातत्याने जाणवतो. आणि तो सूक्ष्मातिसूक्ष्म अशा स्वरूपाचा असल्याचे वरवर प्रखर वाटत नसला तरी तो जिवाची कालवा-कालव करून टाकतो. वाचकांना अंतर्मुख बनवितो.

४) या खेरीज निसर्ग विरुद्ध मानव अशा प्रकारचाही एक तरल संघर्ष 'गोतावळा' मध्ये आपणास जाणवतो. नारबा हा निसर्गप्रेमी आहे. त्याला संघर्षाचे रंग-गंध आवडतात. स्पंदने जाणवतात. तो त्याच्या सौंदर्याने धुंद होतो. मातीतून वर येणारा चैतन्याचा तो इवलासा अंकूर असो. अथवा हात वर करून आकाशाला गवसणी घालणारा विशाल वृक्ष असो. ससांना लपण्यास उपयोगी पडणारा झाडझाडोरा असो अथवा मानवाच्या दृष्टीने निरुपयोगी ठरणारे एखादे झाड असो. पानांची-फांद्याची लेणी अंगावर मिरवत वाऱ्याबरोबर डौलाने डोलणारा माळ त्याला परमेश्वराचे दृश्य प्रतीक वाटते. पक्ष्यांची कुज-

वूज, झऱ्याचा खळखळाट, वाऱ्याचे कूजन, मोटेचे गाणे, पाटाचे पाणी, प्राण्यांचा आवाज झाडांच्या सावल्या, मोरांचा पिसारा, या साऱ्या गोष्टी सौंदर्याचे तराणे वाटतात. ही झाली एक बाजू. पण मालकाला या साऱ्याच गोष्टी अडगळीच्या वाटतात. निरुपयोगी वाटतात. पांढऱ्याधोट कपड्यातला शहाणा माणूस आधुनिक शेतीसाठी या साऱ्यांचा ‘ निकाल ’ लावायला सांगतो. आणि तेथूनच निसर्ग विरुद्ध मानव या संघर्षाला सुरुवात होते. मालक सारा माळ भुंडा करतो. बघता बघता तो माळ हातपाय झडलेल्या महारोग्यासारखा वाटतो. निसर्गाच्या नकळत होणाऱ्या अलौकिक स्पर्शामुळे, सहवासामुळे, आपले जीवन सुरळीत व व्यवथित चाललेले असते. याची जाणीव नित्यपरिचयामुळे आपणास येतच नाही. अन् निसर्ग आपला सखा, मित्र हितकर्ता असूनही त्याचा आपण घात करतो. असाच नेमका घात रामू सोनवडा करतो अन् त्यातूनच लेखक निसर्ग विरुद्ध मानव यांचा संघर्ष सूचित करतो, निसर्गाची महती पटवून देतो.

५) डॉ. भालचंद्र फडके आणि श्री. प्रभाकर पाध्ये यांना मानव विरुद्ध मानव अशा प्रकारचा संघर्ष जाणवलेला आहे. “ नरेचि केला हीन किती नर ” ही केशवसुतांची उक्ती रामू मालक व नारबा गडी यांच्या द्वारे साकार केलेली आहे. “ जिवो जिवस्य जीवनम ” या शाश्वत न्यायाने रामा हा मालक नारबाच्या जीवनावर–त्याच्या रक्तावर घामावर जगतो आहे. मानवा–मानवात असलेला हा संघर्ष देखील गौण स्वरूपात आपणास जाणवतो आहे. गरज आहे तोपर्यंत एखाद्या गरीब गड्याला लग्नाचे अमिष दाखवून, झुलवत झुलवत राबवून घ्यायचे. अहोरात्र त्याच्याकडून काम करून घ्यायचे आणि साध्या ड्रायव्हरशी झालेल्या बोलाचालीवरून व प्रसंगावरून वीस वर्षे खपणाऱ्या नारबाला ‘ चालता हो ’ म्हणणे हा मानवा–मानवातील संघर्ष आहे. माणूस हाच सर्वात लबाड प्राणी आहे. निर्दय प्राणी आहे हेच यातून सिद्ध होत नाही काय ? म्हणून दोन मानवामधील संघर्षाचे बीजही या कादंबरीत पडलेले आपणास दिसून येते आहे.

थोडक्यात या कादंबरीतील संघर्ष वाचकांना कृतीप्रवण करीत नाही. तो अस्वस्थ करून सोडतो. त्यातला संघर्ष हा दोन व्यक्तींचा जसा आहे, तसा दोन प्रणालींचा, दोन युगांचा, दोन वृत्तींचा, दोन विश्वाचा, दोन मनोवृत्तींचा, जुन्या नव्याचा संघर्ष आहे. सत्ताधीश–आणि आश्रित असेही त्याला रूप लाभलेले असते. म्हणूनच हा संघर्ष आपणास अंतर्मुख करतो. ‘ पार ’ पलीकडे घेऊन जातो. ‘ पार पलीकडचे ’ पहावयास शिकवितो. जीवनाची जटिलता व अपूर्वता दाखवून देतो आणि त्यातून मानवी स्वभावावर प्रकाश टाकीत टाकीत जीवनातील अंतीम व शाश्वत मूल्यांचा साक्षात्कार घडवितो. असा हा सर्व दृष्टीने श्रेष्ठ असलेला संघर्ष गोतावळा कादंबरीच्या पोटातून आवाज न करता प्रारंभापासून अखेरपर्यंत कधी धुमसत तर कधी प्रकट होत, कधी स्पष्ट तर कधी तरल

पणे व्यक्त झालेला आहे. म्हणून अनेकविध परिमाणांनी नटलेली कादंबरी म्हणून गोतावळा ही श्रेष्ठ कादंबरी ठरते !

**प्रश्न ७–गोतावळा ही कादंबरीतील चित्रित झालेले मृत्यू–चित्रण कसे आहे ते थोडक्यात सांगा.**

**अथवा**

**एक श्रेष्ठ दर्जाची शोकांतिका या दृष्टीने 'गोतावळा' कादंबरीचे मूल्यमापन करा.**

**'निष्पाप, निरुपयोगी प्राण्यांच्या व्याकुळ करणारी मरणाची माळा चित्रित करणारी कादंबरी' या दृष्टीनें गोतवळाचे परीक्षण करा.**

**उत्तर**–सामान्यत: मराठीत नाटक वा कादंबरीतून जे शोकांतिकेचे चित्रण केले जाते ते विविध स्वरूपाचे असते. काही कलाकृतींची अखेर नियतीप्रधान घटनावर आधारीत असते. काही परिस्थितीचा परिपाक म्हणून मृत्यूच्या जबड्यात सापडले जातात. तर काही स्वत:च्या स्वभावातील गुणदोषांचा परिपाक म्हणूनच मरणाला कारण झालेले असतात. दोषपूर्ण मानव, दोषपूर्ण परिस्थिती व दोषात्मक नियती यांचा परिपाक शोकांत कलाकृतीत होत असतो. परंतु 'गोतावळा' कादंबरीचा आकृतीबंद या परंपरेनें चालत आलेल्या साच्यात बसत नाही. सामान्यत: शोकांत कलाकृतीतील धीरोदात्त नायिका वा नायक कलाकृतीच्या अखेरीस मृत्यूला आलिंगन देतो–त्याची कमालीची चटका लावणारी जाणीव वाचकांना अस्वस्थ करून टाकते. आणि त्यातच त्या कलाकृतीचे यश सामावलेलें असते. परंतु 'गोतावळा' ही या जातीची कादंबरी नाही. नेहमीची रचना नसताना ती शोकांतिकेचा परिणाम साधते. या कादंबरीतील नारबा अखेरीला मृत्यू पावला असता तर कदाचित रूढार्थाने ती शोकांत कादंबरी ठरली असती, पण तसे नसतानाही केवळ सूचकतेवर भर देऊन लेखकाने शोकांतिकेचा परिणाम साधलेला असल्याने एका परीने 'गोतावळा' ने शोकांत कलाकृतीचा रूढ आणि घट्ट झालेला साचा लवचिक केलेला आहे.

'गोतावळा कादंबरीला अनेक परिणामे मिळालेली आहेत. एकेक प्राण्यांचा केविलवाणा होणारा अंत आणि त्यामुळे वाचकांच्या मनात मृत्यूच्या दर्शनाने निर्माण होणारी वलये चित्रित करून एक परिमाण साधलेले आहेच; पण त्याचबरोबर कृषिप्रधान संस्कृतीच्या एका अवस्थेच्या अंत्यदर्शनात सामावलेली व्यथा चित्रित करून तिला दुसरे परिमाण दिलेले आहे. श्रेष्ठ स्वरुपाची शोकांतिका ही एखाद्या नायकाच्या मृत्यूने घडत नाही. त्याग–भोग, आसक्ती–विरक्ती, पाप–पुण्य, सत्य–असत्य, श्रेष्ठ–कनिष्ठ अशा जीवन दर्शनाच्या जीवघेण्या गतिशील प्रसंगांच्या कलात्मक अशा आविष्कारातून साधली जाते. श्रेष्ठ शोकांतिका ही वाचकांना भिववीत नाही. तर अज्ञात जीवनाच्या चिंतनाला ती

प्रवृत्त करते. अज्ञात जीवनाचा साक्षात्कार करून जन्म–मरणाच्या गूढ कोडयावर प्रकाश टाकते. जीवनाच्या अंतिम सत्याचा परिचय करून देत असतानाच जगण्यातला अर्थ आणि अन्वयार्थ वाचकांना प्रतित करून देणे हे शोकांतिकेचे लक्षण असते. अशा शोकांतिका शाश्वत समस्यांना सामोरे जाण्याची मानसिक ताकद वाचकांच्या मनात नकळत निर्माण करीत असतात. आणि ही ताकद गोतावळा वाचकांना नक्कीच देते. याचे कारण येथे घडणारी शोकांतिका एक नाही, अनेक आहेत. आणि त्यामुळेच एक प्रकारचो भोवळ आल्यासमान आपणास जाणवते.

१) एकतर ही एका युगाची शोकांतिका आहे. ग्रामीण संस्कृतीला आकार देणारे जे परंपरागत युग आहे त्याचा यंत्रयुगाने पराभव केल्यामुळे त्या युगाची झालेली शोकांतिका मनास विस्मित करून टाकते. गुराढोरांच्या कष्टावर आणि नोकर–चाकरांच्या श्रमावर उभी असलेली कृषीप्रधान संस्कृती यंत्रप्रधानतेमुळे बदलते म्हणून येथे या अर्थानेही शोकांतिका घडलेली असते.

२) केवळ एका युगाची 'गोतावळा'त शोकांतिका नाही, तर प्राणीसृष्टीची शोकांतिका महत्त्वाची आहे. शेतमळ्यांच्या अंगाखांद्यावरून मिरविलेले एकेक प्राणी मरतात किंवा मारले जातात. अन् तेही क्रमाक्रमाने–हे सारे पाहून वाचक व्याकुळ होतो. एखाद्या धीरोदत्त नायकाच्या मृत्यूच्या परिणामाप्रमाणे विहिरीत पडलेले आंधळे घोडे तीन दिवस उपाशी राहून तडफडत प्राण सोडते आणि गिधाडे–घारी त्यांचे लचके तोडतात. हा मृत्यू ही कमालीचा व्याकुळ करतो. बैलाची तीच गत होते. कोंबडा कापून मारला जातो तोही असाच, मांगांना बैल विकला जातो तीही शोकांत स्वरूपातच, कासवाची हत्त्या होते तीही स्वार्थापोटीच, आणि ससा धरला जातो तोही शोकांत स्वरूपातच ! अशा या प्राण्यांची होणारी जीवनसमाप्ती आकाशातून तेजाळत खाली कोसळणाऱ्या उल्केप्रमाणे भासते. क्षणापूर्वी तेजाचे आगर असलेली उल्का शेवटी पत्थर बनते. त्याप्रमाणे चैतन्याचे हे सारे ठिपके कणाकणाने मातीत विरून जातात. जी जनावरे विकली जातात त्यांचीही अवस्था याच स्वरूपाची होणार असा क्लेशकारक विचार मनात घर करून जातो. म्हणून 'गोतावळा' कादंबरीत एकाच व्यक्तीच्या जीवनाचा भीषण शेवट न दाखवता मुक्या नि प्रतिकार न करणाऱ्या प्राण्यांना इच्छेशिवाय मरणाला शरण जावे लागते. त्याचे सोन्यासारखे जीवन स्वतः मानवच स्वार्थापोटी मातीमोल करून टाकतो ही शोकांतिका तिची प्रमुख शक्ती आहे. क्रमाक्रमाने, प्रत्येक प्रकरणात मरणारे एकेक जनावर ही प्रकरणा–प्रकरणात होणारी एकेक शोकांतिका आहे. या साऱ्याच्या शोकांतिकेची घनदाट छाया शेवटपर्यंत कमी होत नाही. म्हणून प्राणीजीवनाच्या दृष्टीनेदेखील ही एक शोकांतिका श्रेष्ठ शोकांतिका आहे असे आपणास तीव्रतेने जाणवते.

३) त्याचबरोबर नारबाचे भावजीवन उध्वस्त झाल्याने आपणास त्याची देखील शोकांतिका वाटते. तसा नारबा मृत्यूच्या ओठावरचा अग्नि गिळत नाही. पण तो जगून

देखील मेलेला आहे. त्याच्या जगण्याला मरणाची अवकळा आहे. एकेका प्रिय प्राण्याचा त्याच्या डोळ्यासमोर होणारा मृत्यू त्याला आपलाच मृत्यू वाटतो. मेलेले घोडे आणि कापलेले कोंबडे खाताना त्याच्या जिवाची जी कालवाकालव होते, ती या मृत्यूच्या त्याला बसणाऱ्या चटक्यामुळेच ! त्याच्या आंतरिक जीवनाचे सारखे लचके तोडले जातात. ते रक्तबंबाळ केले जाते. शेवटी हे सारे मृत्यू न पचवता आल्याने त्याच्या देहाचा देखील समतोल बिघडतो. आणि त्यावर कळस म्हणजे शेवटी मालक निर्दयपणे मृत्यूच्या प्रदेशात जायला सांगतो. ज्यांच्या भावबळावर तो जगला, ज्याच्या स्नेहावर तो दिवसाची व्यथा विसरतो, ज्यांच्या सहवासामुळे आपले पोरकेपण आणि एकलेपण विसरतो, ती त्याची जिवाभावाची माणसे (ढोरे) त्यालाच मृत्यूच्या दाढेत जात असताना असाह्यतेने पहावी लागतात. म्हणून या कादंबरीत एका अर्थाने नारबाचीही शोकांतिका आहे.

४)आणि त्याचबरोबर वात्सल्य, प्रेम, सहानुभूती, माया, भूतदया इतर मूल्यांचीही या कादंबरीत शोकांतिका होते. या शाश्वत व मंगल भावनांना त्यांचे म्हणून असणारे ' रिवार्ड ' मिळत नाही. त्यांची महत्ता लाभत नाही. रामू सोनावड्याच्या व्यवहारी व निर्दय टाचेखाली ही सारी मूल्यें चिरडून निकामी होतात. त्यांची झालेली वाताहत शोकांतिकेचा परिणाम साधून जाते. आणि वाचकांचेही मन या चिरंतन मूल्यांच्या ओढीमुळे लबथबून निघते. मानवाला मूल्यांची झालेली शोकांतिका पहाणे सोसवत नाही. ती त्याच्या मनाला फार भिडते–रक्तात भिनते. त्यामुळेच सर्वार्थाने ही कादंबरी शोकांतिका नसताना देखील एक श्रेष्ठ दर्जाची शोकांतिका वाटते. नेहमीच्या शोकांतिकेपेक्षा खूपसे अधिक देऊन जाते. कारण या कादंबरीत निर्माण होणारी व विध्वंसास कारणीभूत ठरणारी वादळे सूक्ष्म आहेत. खोल आहेत, आणि त्यातल्या आत होणारी अशी आहेत. पेटलेल्या ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेल्या माणसांची ही शोकांतिका वाटते. चैतन्याचे सजीव ठिपके बघता बघता क्षितिजाच्या ' पार ' होताना मन गलबलून जाते. यातच ' गोतावळा ' कादंबरीचे यश सामावलेले आहे.

त्यात पुन्हा यातील शोकांत भावना मुद्दाम भावविवश केलेली नाही. भडक बनविलेली नाही. अतिरंजितपणाचा मोह लेखकाने मुद्दाम टाळून कमालीच्या तटस्थ वृत्तीने आविष्कृत केलेली आहे. थोडक्यात, भावनात्मक शोकांतिका खूप आहे. घटनात्मक नाही. या दृष्टीने ' गोतावळा ' कादंबरीने देखील शोकांत कलाकृतीचा साचा लवचिक केलेला आहे. एक नवी दिशा दाखवलेली आहे. आशय अभिव्यक्तीचे ताजेपण त्यामुळेच साकार झालेले आहे !

**प्रश्न ८ :– या कादंबरीच्या लोकप्रियतेची मीमांसा करा.**

**अथवा**

**गोतावळा कादंबरीच्या यशस्वितेची प्रतीत होणारी वैशिष्ट्ये थोडक्यात सांगा.**

गोतावळा ची वैशिष्ट्ये

**उत्तर :–** आतापर्यंत आपण जी ' गोतावळा ' कादंबरीच्या अंगांची विविध दृष्टीने चिकित्सा केली ती अंगे या कादंबरीच्या यशाला फार मोठी कारणीभूत ठरलेली आहेतच; पण त्याशिवायही काही गोष्टी तिच्या लोकप्रियतेला उपयोगी पडलेल्या आहेत. नाविन्यपूर्ण कथानक; प्रसंगाची कलात्मक मांडणी, शाश्वत विचारांचे संसूचन नारबाचे उध्वस्त जीवन प्राणीजीवनाचे चित्रस्पर्शी चित्रण, तिच्यातला आगळा–वेगळा संघर्ष, शोकांतिकेची रुंदावलेली कल्पना; सूक्ष्म निरीक्षण, एका चिरंतन दुःखाचा भगभगता झालेला आविष्कार; तिच्या कथनपद्धतीचे वेगळेपण, जीवनाचा व जगण्याचा तिने लावलेला अर्थ आणि अन्वयार्थ, शाश्वत मूल्यांच्या होणाऱ्या शोकांतिकेमुळे साधला जाणारा परिणाम इ. अनेक कारणे या कादंबरीच्या लोकप्रियतेला व श्रेष्ठत्वाला कारणीभूत ठरलेली आहेतच. या साऱ्याचा विचार केल्याशिवाय तिची यशस्विता आपणास पाहता येत नाहीच. पण त्याशिवाय आणखी काही वेगळेपण आपणास सापडते का ते थोडक्यात पहावयाचे.

(१) या कादंबरीत साध्या वास्तवातून सौंदर्याचा आविष्कार केलेला आहे. वास्तवाचे जे अंगभूत असे सौंदर्य असते तेच लेखकाने आणलेले आहे. आकृतीबंदातून आणि कल्पकतेच्या साह्याने निर्माण केलेल्या भडक नाटयातून हे सौंदर्य आविष्कृत केलेले नाही. वास्तवच त्याच्या स्वाभाविक सौंदर्यात्मक गाभ्यासह वाचकासमोर ठेवलेले आहे.

(२) त्याच बरोबर या कादंबरीचे निवेदन पाहता; त्यातील भाषा पाहता, काव्य, कादंबरी व नाटय या तीन प्रकारांना एका मुशीत ओतण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणजे या तीन साहित्यप्रकारांची वैशिष्टये व त्याद्वारे साधला जाणारा परिणाम एकाच कलाकृतीतून व्यक्त केलेला आहे. म्हणून ही रुढ अर्थाने कादंबरी आहे. तसेच ते एक श्रेष्ठ गद्यकाव्य आहे आणि त्याचवेळी सूक्ष्म नाटयाची पखरण करून जीवन नाटयाचा आविष्कार करणारी नाटयकृती आहे. त्यामुळे तिला अभिजातता आहे.

(३) तसेच तिची यशस्विता व लोकप्रियता कोणत्याही बाह्य अथवा अकलात्मक मोहाला बळी न पडता कलात्मक प्रेरणेचा जो सच्चा आविष्कार झालेला आहे त्यात आहे. लेखकाने कोणतीही पोज न घेता त्याला जे जे भावले व अनुभाविक करावेसे वाटले; ते ते तितक्याच आत्मगर्भ वस्तुनिष्ठेच्या साह्याने व्यक्त केलेले आहे. कोणताही एखादा वाद त्यात घुसडून त्याचे समर्थन केलेले नाही.

(४) एवढेच नव्हे तर आणखी एक किमया लेखकाने करून दाखविली आहे. आणि ती म्हणजे मुक्या प्राण्यांना त्यांने सुंदर व्यक्तित्व बहाल केलेले आहे. प्राण्यांचे सूक्ष्म–नि सूक्ष्म वर्णन व त्याला त्यांच्या भावभावनांची दिलेली जोड पाहिल्यावर यादवांना प्राण्यांची भाषा समजत नसूनही ती वाचकांना समजावून दिलेली आहे. त्या मुक्या प्राण्याच्या व्यक्तिमत्वाचा लोभसवाणा आविष्कार लेखकाने साधलेला आहे. केवळ प्राण्यांचा साधन, म्हणून वापर केलेला नाही. हे तिच्या लोकप्रियतेला लाभलेलें एक महत्वाचे कारण आहे.

(५) शिवाय नारबाची व्यक्तिरेखा तशी स्थिर नाही. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत नाही. ती पहिल्या ३।४ प्रकरणात जी व जशी जाणवते तेच धर्म शेवटपर्यंत प्रतीत होतात. आणि प्रसंगांचे स्वरूप एखाद्या चित्रगॅलरी सारखे सुटे सुटे आहे. या दोन्ही गोष्टी एकात्म करून कादंबरी उभी करणे अवघड असते. ही दोन्ही आवाहने यादवांनी मोठ्या ताकदीने स्वीकारली आणि 'गोतावळा' यशस्वी केलेली आहे. विस्कळित एक-साची, तेच ते प्रसंग घेऊन देखील त्याला कलात्मक रूप देण्याचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे.

(६) एवढेच नव्हे तर लेखकाने कल्पनाशक्तीचा केलेला वापरही पृथगात्मकता आणि लोकप्रियता मिळवून देण्यास कारणीभूत ठरलेला आहे. संवेदना आणि संकल्पना याची गाठ घालून देण्याचे वेगळे कार्य या कादंबरीत घडलेले आहे. इंद्रियसंवेदना जुन्या ज्ञानाच्या कुपीत ओतण्याचा प्रयत्न केलेला आहे. कांटने म्हटलेले आहे की, संवेदनाखेरीज संकल्पना रिती असते. आणि संकल्पनेखेरीज संवेदना आंधळी बनते. (Concepts without percepts are empty and percepts without concepts are blind) आनंद यादवांनी या दृष्टीने आपल्यास माहीत असलेल्या असंख्यांना नारबाच्या मनात भिनवून टाकलेले आहे. या कादंबरीत कल्पनाशक्ती सजवण्यासाठी येत नाही. तर नारबाचे भावविश्व संपन्न करण्यासाठी अवतरते. जे अनाकलनीय व अगोचर आहे ते जाणून घेण्यासाठी कल्पकतेचा वापर केलेला आहे. आणि या साऱ्यांतून एक नवे विश्व निर्माण केलेले आहे.

७) या कादंबरीत दुःखाचे जे चित्रण केलेले आहे तेही तिच्या यशस्विनेला कारणीभूत ठरलेले आहे. एकाच प्रकारचे आणि तात्कालिक असे दुःखाचे वर्णन यात आलेले नाही. यात पोरकेपणाचे दुःख आहे. भूतदयेपोटी निर्माण झालेले दुःख आहे. यात शाश्वत मूल्यांच्या ऱ्हासामुळे होणारे दुःख आहे. निर्दयता आणि व्यवहारिकता यांच्या आसुरी चित्रणातून व्यक्त झालेले दुःख आहे. मृत्यूच्या आघातामुळे जन्मलेले दुःख अपेक्षाभंगाचे दुःख आहे. जोडलेल्या नात्याच्या ऱ्हास होणाऱ्या ठिणग्यातून झिरपणारे दुःख आहे. क्षुधेचे दुःख आहे. एकलेपणाचे दुःख आहे. 'चांगले' आणण्यासाठी 'अधिक चांगले' गमावल्याचे दुःख आहे. एकलेपणाचे दुःख आहे. दुभंगलेल्या मनाचे दुःख आहे. करुणेतून जन्मणारे दुःख आहे. व्यक्ती, नाती, नियती, माती आणि विकृती यांच्या ताणातून निर्माण होणारे साऱ्या जातींचे दुःख या कादंबरीत चित्रित झालेले आहे. मानवानेच मानवाला दिलेले दुःख आहे. सुखाच्या हव्यासापोटी सुखामुळेच निर्माण झालेले दुःख आहे. अशा प्रकारे विरहाचे व गैरसमजातून निर्माण होणारे गोड नि लुसलुसीत दुःख या कादंबरीत नाही. सुखाची चव अधिक लज्जतदार बनविण्यासाठी मुद्दाम आणलेले दुःख यात नाही. म्हणूनच मानवी जीवन आणि त्याला कणाकणाने वेढणारे व गिळून टाकणारे दुःखद चित्रण या कादंबरीला असामान्याच्या पदवीला नेऊन पोचविते. यात तिची लोकप्रियताही दडलेली असावी.

८) एवढेच नव्हे तर मानव निसर्ग व मानवेत्तर प्राणी यांच्या परस्पर सहकार्याचे महत्त्व आणि यांच्या दुराव्याचे दुष्परिणाम या कादंबरीने उभे केलेले आहेत. या तीन घटकांच्या नात्यांचा सुंदर मेळ असेल तर जीवन अथवा संस्कृती काय यात समतोल साधला जातो असेच जणू लेखकाला सूचित करावयाचे असावे. हा समतोल बिघडला की माणूस सुखाला पारखा होतो असेच जणू लेखकाला अभिप्रेत असावे. आणि ते मोठ्या कौशल्याने लेखकाने शब्दांनी 'गुंफलेले' असल्याने ही कादंबरी अलौकिक अशी बनलेली आहे.

९) काही समीक्षकांना प्रथमतःच या मराठी प्रादेशिक कादंबरीत शेतमजुराचे जीवन चित्रित केलेले असल्याने एका जिव्हाळ्याच्या व नव्या विषयाचा ताजा आविष्कार करण्याच्या दृष्टीनेही ही मोठी वाटते. नाविन्यपूर्ण वाटते. आतापर्यंत अशा स्वरूपाची चित्रे मराठी कथेतून खूप प्रमाणात चित्रित झालेली आहेत, पण कादंबरीमधून पोटावारी राबणाऱ्या एक माणूसही ढोरांचे जीवन जगणाऱ्या शेतमजुराच्या जीवनाची वाताहत प्रथमच या कादंबरीत प्रतिबिंबित झालेली असल्याने एका उपेक्षित अंगाचा झालेला साहित्यिक आविष्कार या कादंबरीला मोठेपणा देऊन जातो. रचनेतल्या नाविन्याबरोबरच विषयाचे नाविन्य असेल तर तो प्रयोग शाश्वत ठरतो. येथे या शाश्वताला असे दोहोंचे भक्कम अधिष्ठान लाभलेले आहे. म्हणून भिन्न भिन्न अभिरुची असलेल्या वाचकांनादेखील ती तितकाच कलात्मक आनंद देऊन जाते.

१०) सेक्सचे एका वेगळ्या पद्धतीचे चित्रण आणि त्यात वापरलेली सूचकता 'गोतावळा' कादंबरीला श्रेष्ठत्व प्राप्त करून देते. नारबाची सेक्सबद्दलची अनावर ओढ व ओपला आलेल्या पाडीची सेक्सच्या रूपाने झालेली अभिव्यक्ती एकत्र आणलेल्या आहेत. [दोन भिन्न प्रकृतीच्या मनाला असलेले हे शरीर आकर्षण अश्लिलतेचा वा उघडा-वाघडेपणाचा स्पर्श होऊ न देता मोठ्या ताकदीने येथे केलेले आहे. तिला भोगाचे स्वरूप आलेले नाही. गरजेचे स्वरूप आहे.] अविभाज्य अशा जीवन पोषणाच्या घटकाचे स्वरूप आलेले आहे. जीवनाला लालित्य आणि लालिमा आणणाऱ्या शाश्वत भावनेचे स्वरूप प्राप्त करून दिलेले आहे. संस्कृतीवर्धन व वंशसातत्याचा घटक म्हणून या कादंबरीतील 'सेक्स' चित्रित झालेले आहे. यात भोगाची लालसा नाही, कामवासना नाही, कामभावना आहे, म्हणून एका अपूर्व रीतीने या भावनेचा मोठेपणा व त्याविना निर्माण होणारा रितेपणा 'गोतावळा' कादंबरीच्या जिव्हाळ्याचा व ममत्वाचा विषय बनतो. यातच कलावंतांचे सुजाणपण सामावलेले आहे.

११) प्रादेशिक साहित्याची अभिव्यक्ती करणारा लेखक पात्रांच्या मुखातले संवाद ग्रामीण भाषेत आणि निवेदन नागर भाषेत करीत असे. माडगूळकरापासून तो मिरासदार, शेळके यांच्यापर्यंत साऱ्यांनी हीच पद्धती अवलंबलेली आहे. यादवांनी आपल्या कथामधून

संपूर्ण ग्रामीण भाषा वापरून संवेदनाच्या पातळीवरील भावानुभव कथेत व्यक्त करण्याचा एक धाडसी प्रयोग केला. तोच प्रयोग आपल्या पहिल्या 'गोतावळा' कादंबरीत त्यांनी यशस्वी करून दाखवला आहे. पहिली चार–दोन प्रकरणे वाचताना नागर अथवा शहर-वासीय वाचक त्या भाषेमुळे अडखळेल–बिचकेल. तिचा संपूर्ण आशय त्याला कळणार नाही. पण पुढे पुढे मात्र समजतो. आणि नारवाच्या मुखाद्वारे तीच अनुभूती ज्या स्वाभाविक रूपात व अपरिहार्य भाषेत व्यक्त होऊ पहाते आहे. तीच भाषा त्यांनी वापरली आहे. म्हणून रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' आणि यादवांची 'गोतावळा' या आशयाला अनुरुप अशा ग्रामीण भाषेची अभिव्यक्ती स्वीकारूनच वाचकांना सामोरे जातात. भाषेचा असा लोलकाप्रमाणे व बिलोरी वापर करण्याचा यशस्वी प्रयोग केल्याने या कादंबरीने प्रादेशिक कादंबरीत वेगळे 'घराणे' निर्माण केलेले आहे. त्यांची भाषा सजावटी-साठी येत नाही. त्यातील एखादे–दुसरे वाक्य अथवा शब्द हलविला तरी रंगाचा, बेरंग होतो. म्हणूनच मर्ढेकरांच्या लयतत्वात संपूर्ण कादंबरी बसवून दाखवता येते असा दावा श्री. प्रभाकर पाध्यांनी केलेला आहे. नव्या समीक्षकांना केवळ या गुणांमुळेही ही कादंबरी आवडावी अशी आहे.

१२) याखेरीज विचार, भावना आणि संवेदना–यांचा एकात्म आविष्कार हे या कादंबरीचे फार मोठे यश आहे. केवळ विचार कादंबरीला रुक्षता देतात. केवळ कमनीय भावनांची लसलसती अभिव्यक्ती वाचकांच्या अंतःकरणाला कुरवाळते–गुदगुल्या करते. तर केवळ सूक्ष्म आणि विविध पातळीवरील तरल व मुलायम संवेदना वाचकांना सैरभैर करते. पण या तिन्हीचा सुंदर अन् ललितमधुर गोफ विणून त्यांना एखाद्या चिरंतन सत्याच्या सूत्रात गुंफल्यावर मात्र जीवनाचे एक नवेच दालन वाचकांना प्रतीत होते आणि त्यातून त्याला अलौकिक असा आनंद प्राप्त होतो. असा अलौकिक आनंद देण्याच्या बाबतीत ही कादंबरी कमालीची यशस्वी ठरलेली आहे. त्यामुळे ती लोकप्रियही झाली आहे.

(१३) तिचा आणखी एक विशेष म्हणजे 'गोतावळा' कादंबरी म्हणजे एक समूह-चित्रांचा नवा आविष्कार आहे. समूहगाव, समूहजीवन आणि समूह मरणाचे ते अभिनव प्रकटीकरण आहे. एकाच व्यक्ती वा वस्तू ऐवजी येथे समूहाचे प्रातिनिधिक असे चित्रण लेखकाने केलेले आहे. व्यक्ती, वस्तू आणि वनस्पती यांच्या श्वासनिःश्वासाचे हे चित्रण हवेतून जसा गंध प्रतीत व्हावा तसे प्रतीत होते. यातले कोणतेही पात्र वा प्राणी सुटा नाही. अगदी नारबा राहात असलेल्या खोपीसह साऱ्यांचे सामुहिक असे एक चलत्चित्र लेखकाने वेगळ्याच ढंगाने वाचकांना पेश केलेले आहे. हे वेगळेपण आपणास भारावून टाकते. या जगात असूनही आपणास क्षणकाल वेगळ्या जगात नेते. त्या जगातल्या समुहाशी बोलतो. त्यात वावरतो. त्यांची सुखेदुःखे आपली मानून हृदयाशी धरतो. ही घटना मराठी कादंबरीच्या क्षेत्रात वेगळी दिशा दाखवून देण्यास समर्थ झालेली आहे. आणि या सामर्थ्याचे सौंदर्याचे आपणास सातत्याने मोहित करीत असते वेडावून टाकते.

(१४) तरीही या कादबरीच्या यशासंबंधी नापसंती दाखवून कलाकृतीचे अपयश काही लेखकांनी–समीक्षकांनी दाखवून दिलेले आहे. मीनाक्षी रायकर (समाज प्रबोधन पत्रिका) यांनी या कादंबरीतील तोचतोपणा दाखवून तिच्या संथ गतीबद्दल नापसंती दाखवून तो एक अर्धा यशस्वी व अर्धा अयशस्वी असा प्रयोग असल्याचे नमूद केले आहे तर प्र. श्री. नेरूरकर यांनी मात्र घाणाघाती शब्दांचे प्रहार करून या कादंबरीचे अपयश लेखकाच्या पदरात टाकलेले आहे. ते लिहितात, "कादंबरीकार प्रा. फडक्यांप्रमाणेच एक कलाकार व कलानिर्मितीप्रवण कारागीर या दृष्टीकोनातून नारबाला टिपण्याचा हव्यास धरतो. नारबाला ढोरातलं ढोर ठरविण्याचा अट्टाहास कथेतील मालकापेक्षा कादंबरीकाराचाच–अधिक दिसतो. आपल्या कलाकृतीच्या कोरीव व नक्षीदार चौकटीत दाव्याला गोरु अडकावून ठेवावं; तसा तो नारबाला घट्ट आणि फिट्ट बांधून ठेवतो. त्याला कुठेच आक्रमक बनविले नाही. त्यामुळे त्याचे अंड चेचलेल्या बैलासारखे निर्बिजी–करण करून टाकतो. नारबा ही जी दारुण कथावास्तवता आहे तिच्यावर लेखक अन्याय करतो. लेखकाचे मानवी मनाचे दर्शन केवळ कातडी खोल (Skin–deep) एवढेच राहते. अंतःकरणात ती पात्रे कुठेच जाऊन भिडत नाही. आणि म्हणून गतिमान, खोल, श्रेष्ठ अशा जीवननिष्ठ अशा सृजनशील आत्मखोल (Soul–deep) कलाकृत्तीचे परिमाण गमावून बसते. तिला कुठेच हिमालयाची उंची गाठता येत नाही. म्हणून गोतावळा कादंबरीतील प्रभावी अशा घटना वस्तूदेखील निष्प्रभ व निर्जीव ठरलेल्या आहे. जीवनातील सत्याची केवळ फोटोग्राफिक दर्शनीय अनुभूती तेवढीच दाखवून लेखक मोकळा होतो; म्हणून अति साधारणी कारणामुळे (Over–Simplication) ती कलारूपाचा ध्यास घेत व्यक्त होत असल्याने जीवनशून्य बनलेली आहे." (धरती मासिक : मार्च १९७२).

तरीही एकांगी व खोटा अभिनिवेशी दृष्टीकोन न धरता असेच म्हटले पाहिजे की, गोतावळा कादंबरी ही मराठी भाषेतील एक कलात्मक चमत्कार आहे. तो एक नवे क्षितीज शब्दांकित करण्याचा धाडशी प्रयोग आहे. माणसांची प्रस्थापित नाती झुगारून देऊन नवी अमानवी नाती जोडणाऱ्या व जपणाऱ्या एका अवलियाची ही श्रेष्ठ अशी दर्दभरी कहाणी आहे. तिच्यातून जगापलिकडचे जग–विश्वाच्या पोटातील विश्व दाखवण्याचे अपूर्वत्व प्रत्ययाला येते. एका सामान्य व्यक्तीच्या जीवनातील अति सामान्य प्रसंग घेऊन त्यांच्या द्वारे एक असामान्य असे युगांतर घडविले आहे. ज्याची मानवाला निर्मिती करता येत नाही अशा प्राण्यांच्या आत्म्याचा क्रूर संहार आणि त्यांचे व्याकुळ करणारे आक्रंदन मानवाकडून का घडते या यक्षप्रश्नामुळे वाचकांना अन्तर्मुख करायला लावणारी ही समर्थ, समृद्ध, संपन्न, सौंदर्यमयी अन् शाश्वत अशी कादंबरी आहे यात शंकाच नाही ! अन् मन मोकळे ठेवल्यावर शंका यावी तरी का ?

**प्रश्न ९:–'गोतावळा' मधील निवेदनपद्धती आणि भाषाशैली यांची वैशिष्टये सोदाहरण स्पष्ट करा.**

**किंवा**

**" बिलोरी भाषाशैलीचा नाजूक नखरा दाखविणारी यादवांची शैली म्हणजे संथ जलाशयात उमटलेली उत्फुल्ल कमळदलांची छाया आहे." या विधानाचा परमर्श घ्या.**

**किंवा**

**यादवांची निवेदनपद्धती व भाषाशैली यावर टीप लिहा.**

**उत्तर** :–' गोतावळा ' कादंबरीच्या यशामध्ये तिची निवेदन शैली आणि लेखकाची भाषाशैली यांचा फार मोठा वाटा आहे. गोतावळा कादंबरीतील निवेदन आणि भाषा इतर कादंबरीतील भाषेप्रमाणे नाही. तिची प्रकृती वेगळी आहे. मुलायम आहे. गेयतेचे नाजूक पैंजण या भाषेच्या पायात असून काव्यात्मकतेची रेशमी शाल तिने सर्वत्र लपेटलेली आहे. सूक्ष्मतेची मेंदी मोठ्या कलात्मक रीतीने तिने रंगविलेली असल्याने ही भाषा प्रथमदर्शनीच लक्षात येते. या दोन्ही गोष्टींचा विचार एकदम करण्याऐवजी प्रथम निवेदनपद्धतीचा थोडक्यात विचार करू.

' गोतावळा 'ची निवेदनपद्धती प्रादेशिक कादंबरीत तरी नवीन आहे. सामाजिक कादंबरीत नाही. ग्रामीण जीवनातील अनुभूतींचा लेखकाने स्वतः कलावंत या नात्याने मनःपूर्वक अनुभव घेऊनही त्याचा आविष्कार मात्र स्वतः केलेला नाही. तर याउलट नारबा नावाच्या शेतमजुराच्या मुखातून सारे कथन केलेले आहे. नारबाने एका वर्षात बुडत जाणाऱ्या शेतीसंस्कृतीतील प्राणीजीवनांच्या खुणा नोंदविलेल्या आहेत. शेती, मळा, शेतीची मशागत, विहीर खणणे आणि गुराढोरांची निगा राखणे इत्यादींचे चित्रण आपल्या मुखातून केलेले आहे. हे निवेदन त्यामुळे त्याला जे जे प्रतीत झाले–भावले किंवा दिसले तेवढ्याच ग्रामीण संस्कृतीचे आलेले आहे. सदैव मळ्यात राहणाऱ्या आणि जनावरांनाच आपला गोतावळा मानणारा **नारबा आपल्या भावविश्वाची प्रतिक्रिया नोंदवीत** आहे. त्यामुळे या निवेदनपद्धतीला त्याच्या डायरीचे स्वरूप आलेले आहे. त्याच्या जीवनाशी निगडित असलेले तेवढेच अर्थात या डायरीत आलेले आहे. मळ्यावर फुलारलेले विश्व आणि त्याची होणारी वाताहत हाच त्याच्या डायरीचा प्रमुख हेतू आहे. म्हणून निवेदनपद्धतीचे प्रथम लक्षात येणारे हे एक वैशिष्ट्य आहे.

अर्थात डायरीचे माध्यम स्वीकारल्यामुळे आणि प्राणीसृष्टीतील सूक्ष्म बारकावे क्रमाक्रमाने टिपणारे त्याचे मन असल्यामुळे या निवेदनाला एखाद्या चलत–चित्राची आकृती लाभलेली आहे. चित्रामागून चित्र वाचकांसमोर येते. आपला परिणाम साधते आणि बाजूला सरते. नंतर दुसरे चित्र येते. परिणाम साधते अन् बाजूला होते. पण दोन्ही चित्रात नारबा हा साक्षी असल्याने ती तुटक वाटत नाहीत. त्यात आंतरिक नाते जाणवते. आणि ही दोन्ही चित्रे त्याच्या अन्तःकरणाच्या मुशीतून वर आलेली असल्याने त्याला वृत्तीचे साधर्म्यही लाभलेले असते. म्हणून नारबा एकादी गोष्ट सांगत नाही; तर ती आंतरविश्व आणि

बाह्यविश्व या दोन विश्वांचा आविष्कार करतो. जनात घडणारे सांगतो व त्यामुळे मनात घडणारे व्यक्त होते. हा या निवेदनाचा फायदा आहे.

शिवाय नारबाला लेखकाने संवेदनाशील आणि काव्यात्मक मनोवृत्तीचा दाखविलेला आहे. त्यामुळे बाहेरच्या जगात घडणाऱ्या घडामोडींचे चिंतन काव्यात्मक स्वरूपात यात व्यक्त झाल्याने कादंबरीत ते एकजीव झालेले आहे. आंधळ्या घोड्याच्या पडलेल्या दारुण मृत्यूच्या दर्शनाने नारबाचे भावजीवन उचंबळून येते आणि मरणाबद्दल वाटणाऱ्या भावना तो काव्यात्मक रीतीने व्यक्त करतो. हे चिंतन निवेदनपद्धतीत बदल केला असता तर उपरे झाले असते. मृत्यूमुळे निर्माण झालेली चिरंतन सत्याची प्रतिक्रिया या कादंबरीत स्वाभाविक स्वरूपाची वाटते. तो म्हणतो, "घोड्याचा खुदबा झाला. दुसऱ्या दिवशी मेल्यागत पडलं. अंगावर दरडाची माती, पाला-पाचोळा...आलं एकटंच नि गेलंबी एकटंच. मला त्येची आईबी ठावं न्हाय आन् बापबी. दोन-चार दिसानं ते मेलं. त्येच्या ढुंगणातनं किडं जल्माला आलं होतं. घोड्याचा जीवबी एकाद्या वक्ती त्येच्या जन्माला गेला आसल. किड्याचीबी हळूच माती हुईल. त्यातनं बारकी पाखरं, चिलटं घुंगरच्या जन्माला येतील...संपलं घोडं !" (पृ. ५३). म्हणून चिरंतन सत्याच्या साक्षात्कारामुळे निर्माण झालेल्या शोकान्त भावनेची चिंतने व्यक्त करण्याच्या संदर्भात ही निवेदनपद्धती फार उपयोगी पडलेली आहे.

या निवेदनपद्धतीमुळे आणखी एक फायदा झालेला आहे. आणि तो म्हणजे नारबाचे भावविश्व आणि त्याची वेदना यांचा सुंदर विकास करता आला. लेखकाला त्याचा विकास जितका हळूवारपणे व सखोल स्वरूपात करता आला असता; त्यापेक्षा नारबालाच आपले मन उघडे करणे अधिक सोपे गेले आहे. एवढेच नव्हे तर या आत्मनिवेदनामुळे प्राण्यांचे जीवन आणि नारबाचे जीवन यांचा सुंदर भावमिलाफ होऊ शकला. तो आपल्या साऱ्या भावभावना प्राण्यांच्या माध्यमातून व्यक्त करू शकला. प्राणी केवळ एक माध्यमच राहिले नाही; तर त्याच्या भावबंधाचे धागेदोरे बनले. ही एकरूपता—तदात्मता आणि सूचकता या निवेदनपद्धतीमुळे लाभलेली आहे.

तरीही या निवेदनामुळे लेखकाच्या अनुभूतीविष्कारावर खूप मर्यादा पडलेल्या आहेत असा दोष प्रा. प्रल्हाद वडेर यांनी प्रतिष्ठान (मार्च १९७२.) या मासिकात दाखवला आहे. या आत्मनिवेदनामुळे ग्रामीण जीवनातील सर्वंकष अशा साऱ्या अनुभूती व्यक्त होऊ शकल्या नाहीत. नारबामुळे लेखकाचे हात बांधले गेले आणि तळापासूनच्या साऱ्या सूक्ष्मतिसूक्ष्म अनुभूती त्याला व्यक्त करता आल्या नाहीत. अशी त्रुटी त्यांनी या निवेदनपद्धती संदर्भात नोंदविलेली आहे. श्री. नेरुरकारांना तर ही निवेदनपद्धती म्हणजे फडकेप्रणित कलातंत्राचा मुद्दाम घडविलेला आकृतीबंद आहे असे वाटते. आपली अनुभूती अधिक भावविवश, हळवी व हळुवार करण्यासाठी लेखकाने मुद्दाम आविष्कारपद्धती स्वीकारलेली आहे असे त्याचे मत आहे. तरीही वरील [illegible] लक्षात घेऊनही असे म्हटले पाहिजे की 'गोतावळा' मधील निवेदनपद्धती त्यातून [illegible] व्यक्त होऊ पाहते. आहे आणि त्याचा जो

प्रकृतीधर्म आहे त्याला अनुरूप अशीच आहे. त्याखेरीज दोन भावविश्वाचा एकात्म मिलाफ झाला नसता आणि एका नव्या तंत्राची शोकांतिका आकाराला आली नसती !

भाषेच्या बाबतीत आपणास असेच म्हटले पाहिजे. लेखकाची भाषा ही संपूर्ण कोल्हापूराकडील बोली वापरलेली आहे. त्यामुळे बोलीतील अनेक नवेनवे शब्दही त्यात आलेले आहेत. कथावस्तूचा विचार करता अशा बोलीभाषेतून ही अनुभूती संपूर्णपणे व्यक्त झाली असती. आशयाचा तो एक अविभाज्य असा आविष्कार आहे. आणि नारबाच्या मुखातूनच हे सारे कथन होत असल्याने त्यांच्या मुखात नागर भाषा घालणे कलाविघातक ठरले असते. नारबाच्या जगात जगतो आणि ज्या संस्कृतीचा तो पाईक आहे त्याला साजेशी अशीच त्याची भाषा असली पाहिजे. स्वतः लेखकानेच आपल्या भाषेसंबंधी पुढील स्पष्टीकरण केलेलें आहे, "एकतर मी हेतुतः मुद्दाम ग्रामीण भाषेचा वापर करीत नाही, कलेचे माध्यम म्हणून मला जेव्हा अपरिहार्य वाटते; तेव्हाच त्या निवेदनपद्धतीचा मी अंगीकार करतो. ही अपरिहार्यता आशयावरच अवलंबून असते. विशेषतः एखाद्या कलाकृतीत जेव्हा एखादी भावबस्था अर्थपूर्ण (Significant) झालेली असते; तेव्हा तो आशय स्वतःच अभिव्यक्त होण्याकडे झुकू लागतो. आणि लेखक म्हणून एखाद्या नाटककाराप्रमाणे मी बाजूला सरकतो... भाषा वापरताना माझी धडपड मला जे जाणवले ते जसेच्या तसे जिवंतपणे प्रत्ययकारित्वाने व्यक्त करावे एवढीच असते. हे करताना नागर वाचकाला ती भाषा समजेल की नाही हा प्रश्नच मला कलावंत म्हणून अप्रस्तुत वाटतो. कलावंताला जे निखळपणे जाणवते ते निखळपणाने व्यक्त करून द्यावे," (ललित–जून १९७३) म्हणून 'गोतावळा' मधील भाषा हा एक नवा, यशस्वी आणि समर्थ प्रयोग आहे. एखादी 'टूम' म्हणून मुद्दाम ती भाषा वापरली नाही. त्याला प्रतीत झालेले जीवन जन्मतःच जो रंग, जे रूप घेऊन अवतरले तसेच येऊ दिले पाहिजे. म्हणून 'गोतावळा' मधील भाषा शहरी वाचकांना दुर्बोध वाटली तरी आशयाची जात लक्षात घेता नागर भाषा वापरणे चुकीचे ठरले असते.

शिवाय यादवांनी भाषा ही कमालीची बिलोरी नि आरसपानी सौंदर्याने भिजून चिंब झालेली आहे. या भाषेने ज्यांना भाषा नाही त्या प्राणी सृष्टीलाही बोलके केलेले आहे. त्यांच्या भाषेला लय आहे. गती आहे आणि नादही आहे. त्या नाद-लयीतून रूप आकाराला येते. भाव मुखरित होतात. एवढेच नव्हे तर वाक्यातील शब्दांची रचना इतकी चपलख नि फिट्ट असते की ते त्या जागेवरून हलवले तर त्यांचा समतोल बिघडतो. जे व्यक्त झालेले असते अन् सौंदर्यात्मक असते, तेही निस्तेज होते. मावळून जाते. अशी विचारपूर्वक शब्दांची निवड व बांधणी या बोली भाषेला लाभलेली आहे. एवढेच नव्हे तर या भाषेला भिजलेल्या मातीचा गंध आहे. आणि पिकलेल्या फळाची चव आहे. ताजेपणा तिच्या रोमारोमात भरलेला दिसतो. त्यामुळे ती चांगलीच जोशपूर्ण अशी आहे. आणि कमालीची संवेदनाक्षम, कोमल अशी आहे. म्हणूनच मर्ढेकरांचे लयतत्त्व या भाषेला सहज लावून

दाखवता येते. अन् त्यातून निर्माण होणारे सौंदर्य त्या तत्त्वाच्या चौकटीत बसते. एवढेच नव्हे तर एकात्म झालेले भावविश्व त्याच्या तळापासून व्यक्त करणाऱ्या संदर्भात कमालीची यशस्वी झालेली ही भाषाशैली आहे. ती पात्रांना सुसंगत आहे. घटनांचा गाभा पकडणारी आहे. कल्पकतेचा वेगळा वापर करणारी आहे. उत्कृष्ट अशा उपमा, उत्प्रेक्षा वापरणारी आहे. प्रतिमांचा सूचकतेने वापर करणारी आहे. प्रसंगांना हुबेहुब साकार करणारी आहे. वातावरणाचे गडद रंग निर्माण करण्यात ती कमालीची यशस्वी झालेली आहे. निसर्गाला व्यापक अर्थ देण्यास कारणीभूत झालेली आहे. ती केवळ घासून–पुसून वाचकांना दिपवून टाकण्यासाठी साकार झालेली नाही. शाश्वत आशय आणि अनुरूप अभिव्यक्ती, नवे शब्द-लेणे आणि त्यातून व्यक्त झालेले बिलोरी देखणेपण यांचा सुखद शब्दसोहळा म्हणजे गोतावळा कादंबरी म्हटले पाहिजे !

अशी आहे गोतावळा कादंबरी ! तो एक प्रादेशिक साहित्याचा चमत्कार आहे. कलावंताच्या रसिल्या प्रतिभेला पडलेले ते एक गंधित स्वप्न आहे. मानव आणि प्राणी यांच्या नव्या नात्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करणारी ती दीपिका आहे. वास्तवाचे सौंदर्यात रूपांतर करून जगापलिकडचे जग डोळ्यासमोर उभे करून जीवनाच्या चिंतनासाठी डोळे मिटावयास लावणारी ही एक श्रेष्ठ आणि लोकप्रिय कादंबरी आहे. ती मराठी कादंबरीला एक दिशा दाखविणारी ठरावी एवढी तिची महत्ता आहे. ‘ गोतावळा ’ म्हणजे शब्दसुवर्णाने जडावलेला, प्रतिभाशक्तीने सादर केलेला अलौकिक अनुभूतींचा रसोत्कट नि संवेदनाशील असा सौंदर्यात्मक शाश्वताविष्कार आहे यात मुळीच शंका नाही !

**गोतावळा आणि समीक्षक :**

(१) एका वर्षभरात घडलेली ही कथा यादवांनी विलक्षण ताकदीने सांगितली आहे. इतका त्यांच्या अनुभूतीचा आवाका जबरदस्त आहे. आणि त्यामुळेच ‘ जे शब्दविना संवादिजे ’ या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे यादव निसर्गाशी व गुरा–ढोरांशी एकरूपता साधून त्या मुक्या सृष्टीचे भावजीवन फुलारतात.

–अनिल किणीकर (मागोवा मासिक सप्टेंबर १९७२)

(२) पहिल्या प्रकरणात मालकाची जी वृत्ती प्रकट होते, तिचीच पराकाष्ठा शेवटच्या प्रकरणात होते. आणि या वृत्तीमुळे ‘ काहीतरी चांगले ’ साधण्यासाठी ‘ बरेचसे चांगले ’ उध्वस्त करून टाकलेले असते. आणि त्याचाच ठसा शेवटी खोलवर उमटतो.

–प्रा. रा. भि. जोशी (ललित मासिक एप्रिल १९७२)

(३) नारबाचे व्यक्तित्व हाच ‘ गोतावळा ’ चा केंद्रबिंदू आहे. त्यातूनच नारबाच्या वेदनेचे सारे उफाळ–अंतःप्रवाह उगम पावतात. प्रवृत्तीदृष्ट्या त्याच्या ‘ जाती ’ च्या माणसांना भिडतात. वाचकांना हलवितात.

–प्रा. एस्. एस्. भोसले (नवभारत सप्टेंबर १९७२)

(४) 'गोतावळा' मध्ये लेखकाने अभिव्यक्तीसाठी ग्रामीण भाषेचा हेतुतः उपयोग केलेला आहे. त्यांच्याआधी कुठल्याही ग्रामीण लेखकाने इतक्या परिपूर्णतेने ती भाषा अंगिकारलेली दिसत नाही.

—प्रा. शांता शेळके (ललित जून १९७३)

(५) निसर्ग आणि माणूस यांचे भावसंबंध हा यादवांच्या प्रतिभेचा चित्रविषय बनला आहे. हा चित्रविषय गोचर करण्यात त्यांची प्रतिभा रमलेली असतानाच सर्व जीवसृष्टीत व्यक्त होणाऱ्या जीवननाटयाचाही ती अविष्कार करते···कादंबरी आपले ग्रामीणत्व न सोडता त्याचे अनन्य साधारणत्व अबाधित राखून त्याच्या बाहेर क्षेपावते आहे.

—प्रा. वा. ल. कुलकर्णी (प्रतिष्ठान मार्च १९७२)

(६) अतिशय नीटस लेखन झालेली आणि सर्वार्थाने 'ग्रामीण' असलेली ही मराठीतील पहिलीच कादंबरी आहे···तरीही अतिशय साक्षेपाने लिहिलेली ही कादंबरी शेवटच्या दोन प्रकारात घसरलेली आहे.

—प्रा. अरविंद वामन कुलकर्णी (प्रतिष्ठान मार्च १९७२)

(७) ग्रामीण जीवनातील व्यक्तींना स्वतःच बोलू देणे हा अलीकडील ग्रामीण साहित्याचा एक लक्षणीय विशेषच झाला आहे. 'गोतावळा' मध्येही नारबाचे भावविश्व चित्रित करण्यासाठी स्वतः नारबालाच लेखकाने आवाहन केलेले आहे.

—प्रा. गो. ग. कुलकर्णी (प्रतिष्ठान–मार्च १९७२)

(८) या कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या अनुभवाच्या आविष्काराला त्याच्या बोलीतील संपूर्ण निवेदनाच्या मर्यादा पडलेल्या आहेत. असे वाटू लागते आणि कलाकृतीच्या एकाग्र व एकसंग केंद्राला तडा जातो असाच अनुभव येतो.

प्रा. प्रल्हाद वडेर (प्रतिष्ठान–मार्च १९७२)

(९) यांत्रिकतेखाली चिरडल्या जाणाऱ्या भावनेची हृदयस्पर्शी कथा म्हणजे गोतावळा. पण त्याचबरोबर आणखी एक प्रश्न मनाला भेडसावत असतो की, मनुष्य प्रेम, भूतदया, माया आदर या भावनांचा त्याग यांत्रिकतेचा अंगिकार करताना करणारच का ? या भावनांचा त्याग केल्याशिवाय यांत्रिकता स्वीकारणे शक्यच नाही का ?

(मराठा–सोळा जुलै १९७२)

(१०) समर्थ लेखक एकाद्या प्रसंगाने अस्वस्थ होत नाही; तर जीवनातील एकाद्या तत्त्वज्ञानाने अस्वस्थ होतो याचा समर्थ प्रत्यय आणून देणारा; आणि ग्रामीण मातीशी इमान राखणारा सच्चा लेखक म्हणजे आनंद यादव !

—प्रभाकर सातपुते (विशाल सह्याद्री–१०–६–१९७३)

(११) अस्सल कलाकृती निर्माण केली जात नाही. प्रक्रियेतून ती सहज निर्माण होत असते. कलावंत हा एक निमित्त असतो. आनंद यादवांची 'गोतावळा' ही एक अशीच

ललित कलाकृती आहे. न भूतो सापडलेले ते एक अपघाती घडणे आहे... खरे तर गोतावळा हे एक अस्सल काव्य आहे.

——नारायण आवटी (साधना ९ ऑक्टोबर १९७१)

(१२) गोतावळा कादंबरी सपाट व सफाईदार आरशी-फरसबंदीवरून दंतहीन परंतु आकृती सुंदर सापासारखी सरपटत-सरकत आशावादाला टाकून लेखक आकृतीवादालाच मिठ्या मारीत राहतो आहे हे जाणवते.

——प्र. श्री. नेरूरकर (धरती : मार्च १९७२)

१३) एका चांगल्या विषयाची नाजुक व शैलीदार हाताळणी श्री. यादवांनी केलेली असून रेखीव व कलात्मक प्रसंगांच्या द्वारे मानवी जीवनाचा जमाखर्चच मांडला आहे.

–प्रा. शरद दळवी (साप्ताहिक गोमंतक ९ जानेवारी १९७२)

१४) महापुरुष देखील नियतीचे दास असतात. मग सामान्य माणूस तर नियतीच्या क्रूर चक्रात पुरा रक्तबंबाळ होतो. अशा एका सामान्य माणसाची शोकात्म कथा यादवांनी कमालीच्या तटस्थ वृत्तीने गोतावळा कादंबरीत सांगितली आहे. त्यातून जगण्याचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न कलावंताने केलेला आहे.

–डॉ. भालचंद्र फडके (आकाशवाणी, पुणे–१४ नोव्हेंबर १९७१)

१५) गोतावळा कादंबरीची कथावस्तू एका व्यापक दुःखाला विलक्षण पोटतिडकीने हात घालते. शेतकरी जीवनातील चिरंतन दुःखाचा धगधगता प्रत्यय आणून देते. हे दुःख निमित्तमात्र एका शेतमजुराचे असले तरी मनापासून राबणाऱ्या साऱ्याच कष्टाळू शेतमजुराचे ते सर्वस्पर्शी व सार्वजनिक दुःख आहे.

–श्रीराम कृष्ण वोरकर (महाराष्ट्र टाइम्स १४ नोव्हेंबर १९७१)

१६) जमेच्या बाजूला टाकण्यासारख्या अनेक गोष्टी गोतावळामध्ये असूनही गोतावळा काहीशी फसलेली आहे. ती सुरू झाली घटनाप्रधान कादंबरी म्हणून, पुढे तिची परिणती झाली व्यक्तीरेखाप्रधान कादंबरीमध्ये.

–मीनाक्षी रायकर (समाज प्रबोधन पत्रिका मार्च, एप्रिल १९७२)

१७) गोतावळ्याची कथा आहे जुन्या-नव्या युगाच्या सीमारेषेवरील. सांकेतिकपणा मोडून टाकणारी. भारतातल्या शेतकऱ्यांपुढे आज जी समस्या आहे. ती कलात्मक 'फॉर्म' मध्ये पकडून लेखकानं ती अत्यंत वास्तवपूर्ण रीतीने हाताळली आहे.

नामदेव ढसाळ (नंदा जानेवारी १९७२)

१७) कृत्रिमतेचा लवलेशही नसलेलं अगदी साध्या आणि ओघवत्या भाषेत सहजगत्या कथन केलेले निवेदन सर्वार्थाने वाचनीय आहे.

–विलास (सुयोगसाधना– अंक १९७१)

१८) खऱ्या अर्थाने गोतावळा ही प्रादेशिक कादंबरी आहे.

(दैनिक समाज–३१

१९) कादंबरीला मिळालेले हे यश लेखकाच्या शैलीत सामावलेले अ
उभे केलेले नारबाचे व्यक्तिमत्व बहुरंगी आहे. त्यामुळेच सामान्य घटनांना
प्राप्त झालेली आहे. जीवन आणि वाङ्मय यांचा सुरेख संगम आपणाला या
अनुभवावयास मिळतो.

मुकुंद बेल्हे (बळिराजा–ऑगस्ट १९

२०) या सर्व कथाकथांतून तोचतोपणा जाणवतो. कादंबरी कंटाळवाणी हो

–सुचेता बापट (तेजस्वी–२९ ऑगस्ट १९७

२१) लेखकाचा उद्देश ट्रॅक्टर विरुद्ध प्रचार करावा असा असेल वाटत नाही. पण फक्त नवी सुधारणा घडताना जुन्याची मोडतोड कशी होते एवढेच त्यांना दाखवावयाचे आहे. ते काम त्यांनी उत्तम केलेले आहे. नव्या जगाशी समरस होऊ न पाहणाऱ्या नारबाच्या मनोव्यापाराचे हे एक उत्कृष्ट चित्रण आहे यात शंकाच नाही. पण संपूर्ण कादंबरी बोली भाषेत लिहिणे हा वाचकांवर अन्यायच आहे.

क्ष ( नवा काळ–दि. २१ नोव्हेंबर १९७१ ).

२२) मानवाचा शोध हा सनातन शोध आहे. What man has done to man हा सनातन प्रश्न आहे. त्याचं एक उत्तर रामायणानं दिलं आहे. असंच उत्तर देण्याचा एक यशस्वी प्रयत्न 'गोतावळा' कादंबरीत प्रा. आनंद यादवांनी केलेला आहे. श्री. प्रभाकर पाध्ये. ( केसरी–दि. ५ सप्टेंबर १९७१ ).

२३) "मला दाखवावयाचा होता तो गोतावळ्यात वाढलेला नारबा; त्याच्या भोवतीच प्राण्याचं विश्व आणि ट्रॅक्टरच्या निमित्ताने नारायण आणि जनावरांचा गोतावळा नारायणाच्या भावविश्वातला शेतमळा याची झालेली वाताहत !

–आनंद यादव ( राजस–मार्च १९७२ ).

**शिवाजी विद्यापीठ एम्. ए. १९७३**

१) 'गोतावळा' हे एका सांस्कृतिक वास्ताचे चित्र कितपत आहे ? साधकबाधक विवेचन करा. किंवा

२) 'नारबाच्या उद्ध्वस्त होत जाणाऱ्या भावविश्वाचे दर्शन घडवणे हे 'गोतावळा' कादंबरीचे प्रयोजन आहे' चर्चा करा.

३) टीपा द्या :– १) 'गोतावळा'ची निवेदन शैली.

**शिवाजी विद्यापीठ एम्. ए. १९७४**

१) एक शोकात्म कथा म्हणून 'गोतावळा'चे परीक्षण करा. किंवा

२) 'गोतावळा' ही नुसती प्रादेशिक कथा नाही. मानव आणि मानवनेतर सृष्टी यांच्या एकात्मतेची ती भावकथा आहे, या विधानाचा परामर्श द्या.

टीप द्या :– १) 'गोतावळा' या शीर्षकाची यथार्थता.

REFBK-0022911

## इतर प्रकाशने

- गोतावळा एक अभ्यास
- संध्याकाळच्या कविता
  एक अभ्यास
- ला. टिळक लेखसंग्रह
  एक अभ्यास
- वाग्वैजयंती एक अभ्यास
- साहित्य : निर्मिती आणि समीक्षा
  एक अभ्यास
- टीकाशास्त्र
- भाषाशास्त्र